
# राजकीय सिद्धांत

## परिचय



संपादक

**राजीव भार्गव | अशोक आचार्य**

अनुवाद : हेमंत खानझोडे

**Marathi Translation of**
**'Political Theory: An Introduction' by Bhargava**

Scanned with CamScanner

प्रकरण ३

# स्वातंत्र्य

व्ही. श्रीरंजनी

**रुपरेषा :**

- विषय प्रवेश
- अर्थ
- संकल्पनेचा विकास
- वर्गीकरण : सकारात्मक आणि नकारात्मक स्वातंत्र्य
- भारतातील स्वातंत्र्याची संकल्पना

Scanned with CamScanner

# विषय प्रवेश

खालील वाक्यांचा विचार करा-
बी.ए.च्या विद्यार्थ्यांना पीरियेडला सुटी हवी आहे (परिस्थिती)
मी माझ्या शिक्षकाशी मोकळेपणे बोलतो (समज)
मला माझे करियर निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे (निवड)
२१व्या शतकातसुद्धा दक्षिण आशियातील बरीच मोठी लोकसंख्या दारिद्र्यापासून मुक्त नाही (भौतिक गरजांच्या पूर्ततेचा अभाव)
कोणत्याही देशाला स्वातंत्र्य नाकारु नये (प्रतिष्ठेवर बंधन)

या सर्व वाक्यांमध्ये 'स्वातंत्र्य' या संकल्पनेचे वेगवेगळे अर्थ ध्वनित होतात. त्यांच्यातून स्वातंत्र्याव्यतिरिक्त अन्य संकल्पना उदा. समता, अधिकार, न्याय इ. दिसून येतात. मग या संकल्पनांपासून स्वातंत्र्याला वेगळे कसे काढावे?

## ■ अर्थ ■

'मला कार चालविणे शिकण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य आहे' या वाक्याचा विचार करु या. याचा अर्थ असा की, तुमच्या निर्णयात कोणताही अडथळा नाही. दुसरे असे की, तुम्हाला कार चालविणे शिकण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. तुम्ही कारमध्ये प्रशिक्षकाला सोबत घेवून मोकळ्या रस्त्यावर जाऊ शकता. तिसरे असे की, कार चालविणे शिकण्याचे तुम्हाला स्वातंत्र्य आहे. म्हणून स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे तीन अर्थ स्पष्ट आहेत- (अ) निवडीची संकल्पना, (ब) बंधनांचा अभाव, आणि (क) अनुकूल परिस्थितीची उपलब्धता.

## ■ संकल्पनेचा विकास ■

राजकीय विचारांच्या इतिहासांच्या वेगवेगळ्या कालखंडात अनेक विचारकांनी स्वातंत्र्य या संकल्पनेचे चिंतन केले आहे. त्यांनी मांडलेल्या दृष्टिकोनामध्ये त्यांनी तात्कालिक परिस्थितीचे केलेले आकलन आणि त्यांच्या स्वतःच्या तात्विक विचारांची छाप दिसून येते. आपण वेगवेगळ्या विचारकांच्या दृष्टिकोनांचा विचार करुन त्यामध्ये स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे स्वरुप कसे स्पष्ट होते ते पाहू या.

'मी राजकीय सिद्धांत विषयाची परीक्षा देण्यास स्वतंत्र आहे', या वाक्याचा विचार करा. या वाक्यातून पहिला अर्थ असा निघतो की, कोणालाही परीक्षा देण्यापासून अडविलेले नाही. आता परीक्षा का द्यावयाची आहे याचा विचार करु. कोणीही परीक्षा उत्तीर्ण करुन उज्ज्वल भविष्याकडे जाऊ इच्छितो. जर एखाद्या व्यक्तिला पुढील वर्गात प्रवेश हवा असेल, तर त्याला परीक्षा देणे आवश्यक आहे. जर त्याने परीक्षा दिली नाही तर त्याला अनुत्तीर्ण घोषित केले जाईल. अनुत्तीर्ण होण्याच्या भीतीने परीक्षा देण्यावाचून पर्याय नाही. मला भविष्यात यश प्राप्त करण्यासाठी परीक्षा देणे आवश्यक आहे. पण माझी तयारी नाही. या

Scanned with CamScanner

परिस्थितीमध्ये मला परीक्षा देण्याचे स्वातंत्र्य आहे. पण परीक्षेत यश मिळविण्यासाठी गैरमार्गांचा वापर करण्याचे स्वातंत्र्य आहे का?

थॉमस हॉब्जने (Thomas Hobbes) मानवाच्या नैसर्गिक स्थितीचे कल्पनात्मक चित्र रंगविताना ह्याच स्वरुपाच्या स्वातंत्र्याची संकल्पना मांडली आहे. हॉब्जच्या मते, एखादी कृती करण्यासाठी कोणतेही बंधन नसणे म्हणजे स्वातंत्र्य होय. त्याच्या मते, शृंखलेत जखडलेल्या व्यक्तिला मुक्त होण्याची ईच्छा असते. कारण अडथळा हा त्या व्यक्तिमुळे नसून त्याला बांधणाऱ्या साखळ्यांमुळे आहे. मात्र आजारी या अपंग व्यक्ति ही स्वत:च तिच्या स्वातंत्र्यामधील अडथळा असते. हॉब्जच्या मते, भिती आणि गरज हे मानवी स्वभावातील घटक मनुष्याला स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रवृत्त करतात. मनुष्य कर्ज फेडतो. कारण तसे न केल्यास त्याला तुरुंगवासाची भीति असते.

वरील चर्चेतून दोन मुद्दे समोर येतात- (अ) अन्य व्यक्तिंचा जीव धोक्यात घालून स्वत:चा जीव वाचविणे हे स्वातंत्र्य समर्थनीय आहे काय? (ब) भीति आणि गरजेपोटी व्यक्तिने केलेली एखादी कृती ही त्याच्या स्वातंत्र्यामुळे केली आहे असे मानावे काय?

एखादा भिकारी उपासमारीच्या भीतिने किंवा दिवसभरात एकवेळ तरी अन्न मिळावे या गरजेतून भीक मागतो. त्याची कृती स्वातंत्र्यावर आधारीत आहे काय? कारण भिकाऱ्यांना भीक मागण्यापासून कोणीही रोखत नाही.

वरील उदाहरणामध्ये 'बंधनांचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य' एवढाच अर्थ अपेक्षित आहे. त्यामध्ये निवड करण्याचे स्वातंत्र्य तसेच नैतिकतेचा विचार केलेला नाही. आपण पुन्हा कार चालविणे शिकण्याच्या उदाहरणाचा विचार करु. एखाद्या व्यक्तिला कार चालविणे शिकावयाचे आहे. कारण दुसरे कोणतेही वाहन उपलब्ध नाही किंवा त्याला कारच शिकावी लागेल असे बंधन असेल. परंतु त्याला कार चालविणे शिकावयाचे आहे की नाही यातून एका पर्यायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे. हॉब्जच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेत पर्यायांची निवड करण्याच्या स्वातंत्र्याला कोणतेही स्थान नाही. भिकाऱ्यांना भीक मागायची की नाही हे ठरविण्याचे स्वातंत्र्य नाही. त्याचप्रमाणे एखाद्या डाकूला स्वत:चा जीव वाचविण्यासाठी दुसऱ्याला लुटण्याचा किंवा ठार मारण्याचे स्वातंत्र्य नाही.

हॉब्जच्या संकल्पनेत व्यक्तिने स्वातंत्र्यामुळे केलेल्या कृती आणि भीतिपोटी किंवा धाकामुळे केलेल्या कृती यामध्ये स्पष्टपणे भेद केलेला नाही. अनेक पर्यायांतून एका पर्यायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य असण्यासाठी अनुकूल परिस्थिती अस्तित्वात असली पाहिजे. ही अनुकूलता भौतिक साधनांची पूर्तता तसेच नैतिकतेतून निर्माण होते. जॉन लॉकने मात्र स्वातंत्र्याच्या संकल्पनेत नैतिक चौकटीचा विचार केला आहे.

आपण पुन्हा एकदा प्रकरणाच्या प्रारंभी घेतलेल्या उदाहरणाचा विचार करु या- 'मला माझे करीयर निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे.' या विधानामध्ये दोन मुद्दे स्पष्ट आहेत - 'माझे करीयर काय असावे हे अन्य कोणीही ठरवू शकत नाही. मी व्हिडीओ जॉकी किंवा लेखक होईन. पण कोणीही मला आय.ए.एस. अधिकारी होण्यासाठी किंवा एम.बी.ए. होण्यासाठी बाध्य करु शकणार नाही. पण माझ्या करीयर निवडीमुळे दुसऱ्यांना हानी पोहोचू नये. म्हणून मी चोर किंवा खुनी होण्याचे ठरवणार नाही.'

अशा प्रकारे जॉन लॉकने नैतिकतेच्या आधारावर असलेली स्वातंत्र्याची संकल्पना मांडली आहे. ही नैतिकतेची चौकट नैसर्गिक कायद्यांवर आधारलेली आहे. त्यामध्ये समतेचे तत्व केंद्रस्थानी आहे. लॉकच्या मते, नैसर्गिक कायदा म्हणजे एका व्यक्तिने अन्य व्यक्तिंच्या जीवित, स्वास्थ्य, स्वातंत्र्य आणि मालमत्तेस हानी पोहोचवू नये. जे निसर्गत: आणि नैतिकदृष्ट्या मान्य आहे, ते करणे म्हणजे स्वातंत्र्य होय. या दृष्टीने स्वातंत्र्य हा नैसर्गिक अधिकार आहे. लॉकच्या मते, प्रत्येकाने समतेच्या तत्वाचे उल्लंघन न करता स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावा. समतेचा बळी देवून स्वातंत्र्याचे अस्तित्व असू नये.

लॉकच्या दृष्टिने स्वातंत्र्य हा नैसर्गिक अधिकार कसा आहे? त्याच्या मते नैसर्गिक अधिकार म्हणून

स्वातंत्र्य हा सार्वत्रिक अधिकार आहे. जो विचारस्वातंत्र्य प्रत्येकाला समानतेने प्राप्त असलेला अधिकार आहे. त्याचबरोबर सर्वांना जीवित आणि मालमत्तेबाबतही नैसर्गिक अधिकार आहे. स्वातंत्र्य हे मनुष्य स्वभावाचे अविभाज्य अंग आहे. म्हणून ते मनुष्यापासून वेगळे करता येत नाही. तात्पर्य, कोणीही व्यक्तीचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकत नाही.

जॉन लॉकने धार्मिक आणि राजकीय सत्ताकाळातील स्वातंत्र्याला अधिक महत्त्व दिले. धार्मिक सत्ताकाळात स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी करण्यात आला. राजकीय सत्ताकाळ स्वातंत्र्याचे नियंत्रण होऊ शकते, पण त्याला बंधन मात्र आणता येत नाही. लॉकच्या संकल्पनेनुसार व्यक्तीला बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या सदसद्विवेकबुद्धीने स्वतंत्र उपभोगण्याचा अधिकार आहे. त्यामुळे व्यक्तीला राज्याच्या यंत्रणेपासून मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य हवे आहे. पण आत्मरक्षणाच्या [illegible] आपले मत ठेवून घेतले जाईल याची हमी देणारे स्वातंत्र्य हवे आहे.

लॉकने आपल्या संकल्पनेत 'बंधनांचा अभाव' आणि 'निवडीचे स्वातंत्र्य' हे दोन घटक मनुष्याच्या स्वातंत्र्यासाठी अपरिहार्य मानले आहेत. पण त्याने योग्य पर्यायांची निवड करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याचा कोणताही मार्ग सुचविलेला नाही. 'मला माझे करिअर निवडण्याचे स्वातंत्र्य आहे' - या वाक्याचा अर्थ लॉकच्या दृष्टिकोनातून असा होईल की - 'माझी करिअरविषयी निवड हाणून पाडण्याचा अन्य कोणालाही अधिकार नाही. मला अन्य व्यक्तिप्रमाणे माझे स्वतःचे करिअर निवडण्याचा अधिकार आहे. माझ्या निवडीमुळे अन्य कोणाचेही नुकसान होऊ नये.'

परंतु अलीकडच्या काळात मनुष्याच्या निवडीवर असलेल्या कृत्रिम बंधनांचा विचार करण्यात आलेला नाही. भिकारी जीवन जगण्यासाठी भीक मागतो. त्याला जगण्यासाठी भीक मागावी असे कोणीही सांगत नाही हे निश्चित आहे. त्याने भीक मागितली, तरी त्यामुळे अन्य कोणाचे नुकसान होणार नाही. म्हणून भीक मागणे हा भिकाऱ्याचा नैसर्गिक अधिकार आहे असे मानावे काय?

थॉमस हॉब्ज आणि जॉन लॉक या दोघांनी विचारकांनी व्यक्तिगत स्वरूपात स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा विचार केला. पण स्वातंत्र्यामध्ये निर्माण होणारे अडथळे आणि असमानता यांचे चिंतन मात्र त्यांच्यामध्ये दिसून येत नाही. लॉकने नैसर्गिक कायद्याचा विचार केला आहे, पण सामाजिक विषमतेचा प्रश्न हाताळलेला नाही. ग्रीनने मात्र स्वातंत्र्यामध्ये निर्माण होणाऱ्या बाधांचा उहापोह केला आहे.

आपल्यापैकी अनेकजण शहराच्या वाहनाने प्रवास करतात. या गोष्टीचे दोन संभाव्य परिणाम आहेत. एक म्हणजे यामुळे आपल्या वाहतुकीचे साधन असलेले लोक आणि वाहन नसलेले लोक असे वर्ग निर्माण होतात. दुसरे म्हणजे वाहनांमुळे सर्वांना हानिकारक असे प्रदूषण होते. म्हणून या ठिकाणी स्वातंत्र्य म्हणजे 'शहरात निर्माण झालेल्या वेळ-अधिक कार्यक्षमता आणि असमानतेपासून लोकांना स्वतंत्र करणे' असा अर्थ आहे. ग्रीनचे स्वातंत्र्य म्हणजे 'योग्य पर्याय निवडणे' आहे. वरील उदाहरणात प्रदूषण-मुक्त शहर हा एक पर्याय आहे.

ग्रीनने स्वातंत्र्याचा आधुनिक दृष्टिकोनातून विचार केला. व्यक्तिने संपूर्ण समुदायाच्या हितासाठी स्वतःच्या स्वार्थाला बाजूला ठेवावे. ग्रीनची संकल्पना मनुष्याला समाजातील कार्यक्षमता आणि असमानतेपासून मुक्ती देणारी आहे. ग्रीनच्या मते विषमता हा स्वातंत्र्यप्राप्तीमधील अडथळा आहे. हॉब्ज आणि लॉक यांच्या विचारांच्या उलट ग्रीनने स्वातंत्र्याला नैसर्गिक अधिकार मानले नाही. धार्मिक आणि राजकीय सत्ताकाळाच्या उदयामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीपासून मुक्ती म्हणजे स्वातंत्र्य असा अर्थ ग्रीनला अपेक्षित आहे. ग्रीनने स्वातंत्र्यामध्ये दोन प्रकारचे अडथळे सांगितले; (१) व्यक्तिच्या सार्वजनिक हिताचा विचार करण्याला रोखणारे अडथळे, आणि (२) समाजातील विषमतेमुळे निर्माण होणारे अडथळे.

लोक कायद्याच्या पालनातूनच स्वतंत्र होऊ शकतात. कारण कायदा हा समाजाच्या सामूहिक इच्छेची अभिव्यक्ति आहे. म्हणजे सर्वांनी मान्य केलेल्या कायद्याचे पालन करणे, त्यामुळे ती समाजात [illegible] [illegible] शकते. कायद्याचे पालन करणाऱ्या समुदायातील व्यक्ती स्वतंत्र असू शकते.

रुसोच्या मते, गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतरच व्यक्ती स्वतंत्र आहे. व्यक्तिने अन्य व्यक्तींवर, समाजातील संस्थांवर अवलंबून न राहता पूर्ण समाजावर निर्भर असावे. कारण समाज पर्यायाने प्रत्येक नागरिकाच्या जीवित आणि हिताचे रक्षण करतो. समाजात सम्मिलीत झाल्याने गुलामगिरीची पाळी येणार नाही. कायद्याच्या पालनातून स्वातंत्र्याचा मार्ग आहे. म्हणूनच रुसोने 'सोशल काँट्रॅक्ट' (The social contract) या ग्रंथात लिहीले की, 'मनुष्य जन्मत: स्वतंत्र आहे, पण सर्वत्र शृंखलामध्ये बंदिस्त आहे.'

पर्याय निवड करण्याच्या स्वातंत्र्याबाबत रुसोचे विचार उद्‌बोधक आहेत. त्याच्या मते योग्य पर्याय कोणता हेसुद्धा आधीपासून ठरविता येते. उदा. कार चालविल्याने प्रदूषणात भर पडते. प्रदूषण हे घातक आहे. म्हणून कारपेक्षा सायकल चालविणे हे योग्य पर्याय म्हणून निवडला जाईल. सायकलचालकांना आणि पादचाऱ्यांना सोयीस्कर व्यवस्था निर्माण केली जाईल. यामुळे प्रदूषणाची समस्या कमी होऊन सर्वांचे हित साध्य होईल.

स्वातंत्र्याचा अर्थ 'सुख प्राप्ती' (Pleasure) असाही लावता येतो. उपयोगितावाद्यांच्या मते स्वातंत्र्य आणि सुख यांच्यात परस्परसंबंध आहे. सुखाची प्राप्ती होण्यासाठी आणि दुःख टाळण्यासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. बेंथॅमने (Bentham) आपल्या चिंतनात हे विचार व्यक्त केले आहेत. त्याच्या मते स्वातंत्र्य हे उपयोगितावादाच्या 'अधिकमत लोकांचे अधिकतम सुख' या मूलमंत्रात आहे. या दृष्टीकोनामुळे खून करणाऱ्या व्यक्तिचे स्वातंत्र्य हे बळी गेलेल्या व्यक्तिच्या स्वातंत्र्याच्या समान [illegible] करते. आपण सुख देणाऱ्या दोन उदाहरणांचा विचार करु या.

(अ) मला सूर्यास्त दर्शनाने सुख मिळते. मला सूर्यास्त पाहण्याचे स्वातंत्र्य असावे.

(ब) मला मादक द्रव्यांचे सेवन केल्याने सुख मिळते. म्हणून मला मादक द्रव्ये घेण्याचे स्वातंत्र्य असावे.

सुखप्राप्तीच्या वेगवेगळ्या प्रकारात उपयोगितावादाने कोणताही फरक केलेला नाही. त्यामुळे (अ) आणि (ब) मधील सुखांमध्ये काही भेद नाही.

आपण स्वातंत्र्याची उपयोगितावादी कल्पना मान्य करु शकणार नाही. याची चार कारणे आहेत. (अ) स्वातंत्र्याच्या उपयोगितावादी संकल्पनेत नैतिक जबाबदारीचा अभाव आहे. मादक द्रव्यांच्या आहारी गेलेली व्यक्ती सर्वांचे नुकसान होईल असे समाज विघातक कृत्य करु शकतो. (ब) व्यक्तिला [illegible] दिल्यास समाजातील अन्य व्यक्तिंचे जीवित, स्वातंत्र्य आणि मालमत्ता धोक्यात येऊ शकते. (क) [illegible] व्यक्तिला मिळणारे सुख हे अन्य व्यक्तिंसाठी दुःख निर्माण करु शकते. त्यामुळे 'अधिकतम लोकांचे अधिकतम् सुख' या उपयोगितावादी तत्वाचेच उल्लंघन होते, आणि (ड) मादक द्रव्यांचे सेवन करणाऱ्या व्यक्तिला सुख मिळते. पण त्याचे स्वातंत्र्य आत्मघातकी आहे. हॉब्जने आपल्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेत आत्मसुरक्षा महत्वाची मानली. तसा विचार उपयोगितावादात दिसून येत नाही.

बेंथॅमच्या शिष्य असलेल्या जे.एस्. मिल ने (J. S. Mill) उपयोगितावादाला अधिक विस्तृत स्वरूपात मांडले.

## स्वातंत्र्यावर मिलचे विचार :

'बी.ए.च्या वर्गाला एका पिरीयडला सुटी हवी आहे', या उदाहरणाचा पुन्हा विचार करु या. प्रथमदर्शनी हा संपूर्ण वर्गाचा सामूहिक निर्णय असेल असे वाटते. पण काही थोड्या विद्यार्थ्यांना पिरीयड व्हावा असे वाटते. यावर शिक्षकाने काय निर्णय घ्यावा? बहुतेक विद्यार्थ्यांना पिरीयड होऊ नये असे वाटते. त्यामुळे थोड्या विद्यार्थ्यांच्या मताचा विचार होऊ नये. आपण याला लोकशाहीने केलेला निर्णय म्हणू शकतो. पण या लोकशाही निर्णयामुळे ज्या विद्यार्थ्यांना पिरीयड व्हावा असे वाटते, त्यांचे मत दडपले गेले आहे.

समाजाच्या आणि राज्याच्या सामूहिक निर्णयामुळे एका व्यक्तिच्या खाजगी गळचेपी होऊ नये. हा मिलच्या स्वातंत्र्यविषयक विचारांचा गाभा आहे. मिलच्या मते, उपयोगिता (utility) ही मानवाचे हित विकसित होत असलेल्या मनुष्याच्या कायमस्वरूपी हितसंबंधांवर आधारलेली आहे. व्यापक दृष्टीने त्याने स्वातंत्र्याचे चिंतन केले आहे. मिलने आपल्या 'On Liberty' या ग्रंथात व्यक्तिस्वातंत्र्याला राज्य आणि समाजाच्या हस्तक्षेपापासून सुरक्षित ठेवावे अशी आग्रही भूमिका मांडली आहे. त्याने बेंथॅमच्या उपयोगितावादाच्याही पुढे जाऊन असे प्रतिपादन केले की, सुखाच्या आदर्श संकल्पनेत व्यक्तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा समावेश होतो. कारण ते व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी आवश्यक आहे. त्यामुळे समाजाची प्रगती साध्य होईल.

मिलने उपयोगितावाद मांडताना प्रामुख्याने दोन मुद्दे विचारात घेतले- (अ) उपयोगितेचे मापन करताना सुखाचा संख्यात्मक आणि गुणात्मक या दोन्ही दृष्टीने विचार करावा लागेल. आणि (ब) उपयोगितावादाने पारंपरिक नैतिक मूल्यांशी असलेली नाळ तोडण्याची आवश्यकता नाही. उलट नैतिक व्यवहारातील नीतिनियमांना उपयोगितावादाने स्वीकारावे.

मिलने मांडलेले वरील मुद्दे वैचारिक पेच निर्माण करणारे आहेत. कारण सॉक्रेटीस दुःख सहन करताना मिळणारे सुख हे डुकराला भेळपुरी खाण्याच्या सुखापेक्षा श्रेष्ठ आहे हे सिद्ध करता येणे कठीण आहे. मिलच्या मुद्द्यांबाबत मतभेद निर्माण होतात. उदा. 'प्रामाणिकपणा ही सर्वोत्तम नीति आहे' (Honesty is the best policy) हे बोधवाक्य सुद्धा त्याचप्रमाणे दुःखही निर्माण करू शकते. मिलच्या मते, अशा विचारांमध्ये स्वातंत्र्य मध्यस्थाची भूमिका निभावते. स्वातंत्र्य हे एक साध्यदेखील आहे. म्हणून स्वातंत्र्य हे व्यक्तिमत्त्वाचे अविभाज्य अंग आहे.

मिलने स्वातंत्र्याच्या प्रमुख तीन पैलूंचा विचार केला- विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि व्यक्तिच्या कृतीवर अधिसत्तेच्या मर्यादा.

मिलने केवळ विचारांची अभिव्यक्ति स्वातंत्र्यच नाही तर व्यक्तिने इतरांची मते ऐकून घेण्याच्या स्वातंत्र्यालादेखील महत्त्वाचे मानले आहे. त्याने अभिव्यक्ति स्वातंत्र्याच्या समर्थनार्थ चार मुद्दे मांडले-

(अ) जर प्रचलित समजुतींविरुद्ध असलेले मत दाबले गेले, आणि ते मत जर योग्य असेल तर त्यापासून आपली समाज वंचित राहील. जरी प्रचलित समजूत वा परंपरा योग्य असेल, तरीही त्या विरुद्ध असलेल्या मताची गळचेपी करणे चुकीचे आहे. कारण चुकीचे मत दाबल्याने समाज सत्याची बाजू कळण्याची संधी गमावतो. म्हणून समाजातील प्रचलित समजुतींविरुद्ध कोणतेही मत असले तरी त्याला अभिव्यक्ति स्वातंत्र्य असावे.

(ब) सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात परस्परविरोधी मतांच्या संघर्षातून सत्य निर्माण होते. म्हणून अनेकविध मते व दृष्टिकोन व्यक्त होणे गरजेचे आहे.

(क) अभिव्यक्ति स्वातंत्र्य योग्य तसेच अयोग्य मतांनाही व्यक्त करण्याची संधी देते. पण चुकीच्या मतांना व्यक्त होण्यापासून रोखू नये. कारण त्या मतांमध्येही सत्याचा अंश असू शकतो. जर ते व्यक्त होऊ शकले नाही, तर आपली समाज सत्याला मुकेल.

(ड) समाजात प्रचलित असलेल्या सत्य आणि योग्य समजुतींनासुद्धा विरोध होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्या अधिक बळकट होतील. अन्यथा त्या समजुतींचे कर्मकांडाप्रमाणे पालन होईल आणि हळूहळू परंपरांचे रूप धारण करतील. म्हणून विरोधी मतांना मान्यता देणे हा सर्वोत्तम मार्ग आहे.

मिलच्या मते, परस्परविरोधी मतांच्या संघर्षातून विचार आणि प्रगतीला चालना मिळते. असे स्वातंत्र्य नसेल तर समाज बंदिस्त व्यवस्थेत राहून जीर्ण होत जाईल. अशा समाजात पूर्वग्रहदूषितपणा निर्माण होतो आणि मते वैचारिक आधार गमावतात.

वैयक्तिक स्वातंत्र्य असल्यास व्यक्ती समाजातील प्रथा, परंपरा आणि आचारपद्धतींचे अंधानुकरण करीत नाही. कारण त्याने जीवनात 'योग्य' वा 'अयोग्य' काय हे अनुभवातून स्वीकारलेले असते. व्यक्ती कशी आहे यावर योग्य-अयोग्यतेचा निर्णय अवलंबून असतो.

मिलने सत्तेचा हस्तक्षेप आणि सामाजीक जुलूम यांच्या विरोधात वैयक्तिक स्वातंत्र्याचे समर्थन केले. त्याने व्यक्तिच्या कार्याचे दोन प्रकार मानले - (अ) स्वत:शी संबंधित कृत्य, आणि (ब) इतरांशी संबंधित कृत्य. व्यक्ति स्वत:शी संबंधित असलेल्या कृत्यांच्या बाबतीत सार्वभौम आहे. इतरांशी संबंधित असलेल्या कृत्य वा निर्णयामुळे व्यक्ति इतरांचे नुकसान करीत आहे काय हे पाहणे महत्त्वाचे आहे. स्वत:शी संबंधित कृत्ये आणि इतरांशी संबंधित असलेल्या कृत्यांमध्ये स्पष्ट सीमारेषा आखणे कठीण आहे. उदाहरणार्थ, व्यसनाधीनता हा व्यक्तिशी तसेच इतरांशी संबंधित असलेला विषय आहे. पण काही अभ्यासकांनी असा प्रतिवाद केला आहे की, जर व्यक्तिने स्वत:साठी केलेल्या कृत्यामुळे इतरांना हानी होत नसेल, तर ते इतरांशी संबंधित कृत्य नाही.

## स्वातंत्र्य : उदारमतवादी दृष्टीकोन

### (Liberty : A Liberty Good?)

स्वातंत्र्य हे उदारमतवादाचे अभिन्न अंग आहे असे नेहमी वाटते. पण जे उदारमतवादी मानले जात नाहीत, अशा विचारकांच्यासुद्धा लेखनात स्वातंत्र्याचे गुणगान केल्याचे दिसून येते. रुसो हा त्याचे उदाहरण आहे. येथे कार्ल मार्क्सचेसुद्धा नाव घेता येईल. मार्क्सने स्वातंत्र्याचा अभाव म्हणजे काय हे सांगून स्वातंत्र्याचा अर्थ स्पष्ट केला.

मार्क्सची 'स्वातंत्र्याचा अभाव' ही संकल्पना समजून घेण्यासाठी 'मला माझे करीयर निवडण्याचे स्वातंत्र्य आहे'. या, मागील उदाहरणाचा पुन्हा विचार करु या. मला असे म्हणता येईल की, 'मला लेखक व्हायचे आहे. म्हणून मी लेखनाला माझे करियर म्हणून निवडीन', परंतु उदरनिर्वाहासाठी अनुकूल परिस्थिती नसल्यामुळे मला कारखान्यामध्ये काम करावे लागत आहे. पण माझे कारखान्यातील काम माझ्यातील लेखकाला वाव मिळू देत नाही. म्हणजे माझेच परिश्रम मला स्वत:पासून दूर नेतात.

मार्क्सच्या मते, सृजनशीलतेची अभिव्यक्ति हा मनुष्यस्वभावाचा उपजत गुण आहे. व्यक्ति स्वत:ला अभिव्यक्त करता येत नाही अशी परिस्थिती असेल तर ती स्वतंत्र नाही असे म्हणावे लागेल. मार्क्सने व्यक्तिला स्वातंत्र्य न मिळण्याच्या प्रक्रियेला 'दुरावण्याची' (alienation) संज्ञा दिली आहे. ही प्रक्रिया चार टप्प्यांमध्ये घडून येते. (१) व्यक्ति उत्पादनापासून दुरावते; (२) नंतर उत्पादन प्रक्रियेपासून दुरावते, (३) पर्यायाने व्यक्ति स्वत:च्या व्यक्तिमत्वापासून दुरावते आणि, (४) शेवटी इतर व्यक्तिंपासून दुरावते. परिणामी व्यक्तिला आहार, निद्रा, प्रजोत्पादन यासारख्या दैनंदिन व्यवहाराखेरीज अन्य कोणत्याही कार्यात रुचि वाटत नाही. व्यक्ति स्वत:ला पशुवत् समजू लागते.

मार्क्सच्या दृष्टीकोनातून व्यक्तिला स्वत:च्या व्यक्तिमत्वाची जाणीव होणे म्हणजे 'स्वातंत्र्य' आहे. व्यक्तिच्या क्षमता आणि शक्तिच्या पूर्ण आविष्कार होतो तेव्हा तिला स्वत:ची जाणीव होते. मार्क्सच्या मते, भांडवलवादामुळे व्यक्ति आपल्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार करु शकत नाही. परंतु त्याने असे मांडले की, भांडवलवाद अशा अन्य समाजाचा भौतिक पाया रचतो की ज्यामध्ये व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा पूर्ण आविष्कार शक्य होतो.

भांडवलवाद व्यक्तिमत्वाच्या आविष्काराला दोन प्रकारे रोखतो - (अ) व्यक्तिच्या मनात इच्छा कशा व का निर्माण होतात हे तिला कळत नाही. त्यामुळे त्या इच्छा आपल्या नसून परक्या आहेत असे व्यक्तिला वाटू लागते. (ब) समन्वय आणि सामूहिक नियोजनाच्या अभावी या इच्छा पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यामुळे समाजात प्रत्येक व्यक्तिची कृती स्वतंत्र आणि परस्परविरोधी घडू लागते. त्यामध्ये स्वेच्छा आणि सामुहिकतेचा अभाव असतो.

आपल्या इच्छांविषयी अनभिज्ञता आणि त्यांमुळे व्यक्तिचा आपल्या व्यक्तित्वाशी होणारा दुरावा याला मार्क्सने 'दुरावलेपण' (alienation) संबोधले आहे.

Scanned with CamScanner

आणि वैचारिक देवाणघेवाण होणे आवश्यक आहे. व्यक्तिस्वातंत्र्यासाठी सर्व दायित्वांना व्यक्तिची संमती असणे महत्वाचे आहे.

## ■ सकारात्मक स्वातंत्र्य

**(Positive Liberty)**

सकारात्मक स्वातंत्र्याच्या संकल्पनेची मूळ धारणा अशी आहे की, प्रत्येक व्यक्तिमध्ये एक उच्चश्रेणीचे तसेच एक निम्न श्रेणीचे व्यक्तित्व दडलेले आहे.उच्च व्यक्तित्व हे विवेकबुद्धीवर आधारलेले आहे. त्याने निम्न व्यक्तित्वावर प्रभुत्व मिळविणे सकारात्मक स्वातंत्र्यासाठी आवश्यक आहे. बर्लिनच्या मते, प्रत्येक व्यक्तिने स्वतःवर प्रभुत्व प्राप्त करण्याची इच्छा बाळगावी. दुसऱ्याच्या इच्छेवर अवलंबून राहू नये.

सकारात्मक स्वातंत्र्य हे कृती करण्याचे स्वातंत्र्य होय. त्यामध्ये संधी मिळवून त्यांचा उपयोग करणे अपेक्षित आहे. पण नकारात्मक स्वातंत्र्यामध्ये केवळ संधी असण्याचा विचार केला आहे. सकारात्मक स्वातंत्र्य हे व्यक्तिला कायदा अथवा श्रेष्ठीजनांकडून दिशादर्शन केले जाईल असे गृहीत मानते. जेव्हा कायदा एखाद्या व्यक्तिला मार्गदर्शन करतो, तेव्हा त्या व्यक्तिचे व्यक्तित्व अधिक स्वतंत्र होते. रुसो हा सकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आहे. कारण त्याच्या मते, नैतिक कायद्यांच्या पालनातूनच व्यक्तिला स्वातंत्र्य मिळू शकते. त्याने विवेकपूर्ण जनतेच्या सामूहिक इच्छेचाही स्वीकार केला आहे. नवमार्क्सवादी विचारकांमध्ये हर्बर्ट मार्क्यूज (Herbert Marcuse) याने देखील सकारात्मक पुरस्कार केला आहे. त्याच्या मते, कामगार वर्गाला त्यांचे खरे ध्येय आणि गरजा कोणत्या आहेत हे कळत नाही. म्हणून त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतीकारी श्रेष्ठीजनांकडून मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे.

सामूहिक जीवनात सामूहिक नियंत्रण असणे हेसुद्धा सकारात्मक स्वातंत्र्यामध्ये अपेक्षित आहे. उदा. प्रदुषण-मुक्त वातावरण कायम राखणे हा सर्वांनी मिळून सर्वांच्या हितासाठी करावयाचा प्रयत्न आहे. त्यासाठी थोडी सक्ती करावी लागली तरी ती बहुजनांच्या हितासाठी उचित आहे.

अनेक उदारमतवाद्यांनी अशी भीती व्यक्त केली आहे की, सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना ही अधिसत्तावादाला प्रोत्साहन देणारी आहे. उदा. आपण एका कायमस्वरुपी शोषित असलेल्या अल्पसंख्यांक समुदायाचा विचार करु या. हा समुदाय बहुसंख्यांकांचे वर्चस्व असलेल्या समाजात राहतो. बहुसंख्यांक असा दावा कदाचित करतील की आमच्या समाजात प्रत्येकाला आपल्या व्यवहार व कृतीबाबत स्वायत्तता देण्यात आली आहे. त्यामुळे अल्पसंख्यांकसुद्धा स्वतंत्र आहेत. पण प्रत्यक्षात ते शोषित आणि असुरक्षित आहेत.

## ■ जे. एस्. मिलचे विचार :

मिलने नेहमीच नकारात्मक स्वातंत्र्याचे समर्थन केले. त्याने एखाद्या रोपट्याच्या वाढीप्रमाणे व्यक्तिविकासाची कल्पना केली. त्याच्या मते, व्यक्तिला त्याची बुद्धी आणि क्षमतेनुसार पूर्ण विकास करण्याची मुभा असावी. कोणावरही व्यक्तित्व विकास बाहेरुन लादता येत नाही. तो व्यक्तिच्या आंतरिक इच्छेतूनच घडून येऊ शकतो.

टीकाकारांच्या मते, मिलची आदर्श स्वातंत्र्याची संकल्पना ही नकारात्मक नव्हे तर सकारात्मक असल्यासारखे वाटते. कारण सकारात्मक स्वातंत्र्यामध्ये व्यक्तिचा वर सांगितल्याप्रमाणे विकास अपेक्षित आहे. स्वतंत्र व्यक्ती स्वतःला विकसित करते आणि स्वतःच्या इच्छा आणि हित निर्धारीत करते. हे स्वातंत्र्य 'केवळ अडथळ्यांचा अभाव' या अर्थाने नाही, तर 'स्व-अस्तित्वाची जाणीव' या अर्थाने आहे.

Scanned with CamScanner

मिलने व्यक्तिच्या जीवनात अ-हस्तक्षेपाचे समर्थन केले आहे. त्यामुळे तो नकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आहे असे मानले जाते. पण त्याचबरोबर त्याने व्यक्तिमध्ये काही निश्चित दृष्टीकोन जाणीवपूर्वक रुजविले जाऊ शकतात असेही प्रतिपादन केले आहे. त्यामुळे मिल हा सकारात्मक स्वातंत्र्याचाही पुरस्कर्ता आहे असे समजण्यास हरकत नाही.

## स्वातंत्र्य आणि अन्य संकल्पना

**(Liberty And Other Concepts)**

### स्वातंत्र्य आणि समता :

स्वातंत्र्य आणि समतेच्या व्याख्या कशा स्वरुपाच्या आहेत यावरुन त्या संकल्पना परस्परविरोधी आहेत की परस्परपूरक आहेत हे ठरविता येते. साधनांचा अभाव आणि त्यांचे वितरण हे या दोन संकल्पनांमध्ये परस्पर संघर्षाचे मूळ कारण आहे. आपण पुढील उदाहरणाचा विचार करु या. एका तुटपुंज्या उत्पन्न असलेल्या कुटुंबामध्ये दोन मुले आहेत- एकाला डॉक्टर तर दुसऱ्याला इंजिनीयर व्हायचे आहे. दोन्ही मुलांसाठी भरपूर खर्च येणार हे स्वाभाविक आहे. कुटुंबीय आपले उत्पन्न समानरितीने दोघांसाठी खर्च करु शकते किंवा कोणातरी एकाला त्याच्या आवडीनुसार शिक्षण घेण्याची मुभा देऊ शकते. साधनांचे वितरण झाल्याने येथे स्वातंत्र्य आणि समता यांच्यात अंतर्विरोध निर्माण झाला.

जेव्हा समतेला संभाव्य परिणाम मानले जाऊन स्वातंत्र्याला निवडीचे स्वातंत्र्य (Freedom of choose) मानले जाते, तेव्हा त्या दोहोंमध्ये परस्परविरोध निर्माण होतो. समतेचे तत्त्व हे सर्वांना समपातळीवर आणण्याचे कार्य करते. त्यामुळे समता निर्माण होण्यासाठी निवड करण्याच्या स्वातंत्र्यावर आपोआप बंधने येतात. वर सांगितलेल्या उदाहरणात जर प्राप्त साधने दोन मुलांमध्ये वाटली गेली तर दोघांनाही समप्रमाणात साधने प्राप्त होतील. परंतु दोघांपैकी कोणीही आपल्या आवडीप्रमाणे शिक्षण घेऊ शकणार नाही. म्हणून निवड करण्याच्या स्वातंत्र्यापेक्षा संभाव्य परिणामांची समता ही अधिक महत्त्वाची आहे.

स्वातंत्र्य आणि समता यांपैकी कोणत्याही एका संकल्पनेला न्याय्यतत्त्वाप्रमाणे (Fairness) मानले तरीही या दोन संकल्पनांमध्ये परस्परविरोध निर्माण होतो. कोणतीही परिस्थिती ही न्याय्य मानली जाऊ शकते किंवा त्या उलटसुद्धा घडू शकते. वरील उदाहरणामध्ये, एका मुलाला सर्व साधने उपलब्ध करुन देणे न्याय्य मानता येईल, कारण दोघांपैकी एकाला तरी आवडीनुसार शिक्षण घेता येईल. परंतु हीच परिस्थिती दुसऱ्या मुलाला अन्याय्य आहे कारण त्याला काहीही मिळणार नाही. तसेच दोघांमध्ये समान वाटप हे न्याय्य त्याचप्रमाणे अन्याय्यसुद्धा मानता येईल.

समता आणि स्वातंत्र्य यांपैकी एकाचा बळी देऊन दुसऱ्याला आचरणात आणले तरीही त्यांच्यात परस्परविरोध निर्माण होतो. स्वातंत्र्य कोणत्या मर्यादेपर्यंत आहे हे जाणून घेण्यासाठी समता किती प्रमाणात आहे हे कळणे आवश्यक आहे. पुन्हा वरील उदाहरणाचा विचार करु या. एका मुलाला आवडीनुसार शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य दिले तर दुसरा मुलगा साधनांमध्ये समान वाटा असण्याचा हक्क गमावतो हे सत्य आहे. प्राप्त साधनांमध्ये समान वाटा देण्याच्या समतेच्या तत्त्वामुळे दोन्ही मुले स्वातंत्र्याचा हक्क गमावून बसतील.

जॉन रॉल्सने (John Rawls) समता आणि स्वातंत्र्य या दोन संकल्पनांमध्ये मेळ निर्माण करण्यासाठी 'अज्ञानाचा पडदा' (Veil of Ignorance) ही कल्पना मांडली. व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखणे तसेच समतेचे कल्याणकारी आणि वितरणात्मक आदर्शांची जपणूक करणे अशी दोन उद्दिष्टे त्याने समोर ठेवली आहेत.

Scanned with CamScanner

रॉल्सने आपल्या 'ए थेअरी ऑफ जस्टिस' (A Theory of Justice) या ग्रंथात मूलभूत स्वातंत्र्याचा विचार मांडला. स्वतंत्र आणि समान असलेल्या व्यक्तिंनी आपल्या नैतिक क्षमतांच्या अनुसार निवडलेल्या स्वातंत्र्याला रॉल्सने मूलभूत स्वातंत्र्य मानले आहे. ती व्यक्तिची 'मूळ भूमिका' आहे असे तो म्हणतो. समाजात आपले स्थान काय आहे हे विचारात न घेता व्यक्ति-स्वातंत्र्य आणि साधने यांच्यात विभाजन करते. रॉल्सच्या मते, विचारस्वातंत्र्य, राजकीय आणि संघटन स्वातंत्र्य तसेच कायद्याच्या अधिसत्तेमुळे मिळणारे स्वातंत्र्य हे सर्व मूलभूत स्वातंत्र्य आहेत. त्याच्या मते, संस्थांचे नियम हे या स्वातंत्र्याला न्याय देऊ शकतील अशा स्वरुपाचे असावे. हे स्वातंत्र्य सर्व नागरिकांना समान रीतिने असावे. रॉल्सच्या मते, साधनांचे न्याय्य पुनर्वितरण होण्यासाठी दोन अटी पूर्ण होणे आवश्यक आहे- पहिली म्हणजे मूलभूत स्वातंत्र्याचे उल्लंघन होऊ नये. दुसरी म्हणजे, निम्नस्तरावरील व्यक्तिच्या हिताचा बळी देऊन साधनांमध्ये वाढ होता कामा नये.

## ■ स्वातंत्र्य आणि समता : परस्परपूरक संबंध?

स्वातंत्र्य आणि समतेची व्याख्या कशी केली जाते यावर या संकल्पनांची परस्परपूरकता अवलंबून आहे. व्यक्तिचे स्वतःच्या जीवनावर असलेले नियंत्रण या दृष्टीने स्वातंत्र्याकडे पाहिले तर परस्परपूरकतेचा विचार करता येईल. या संबंधी तीन मुद्दे महत्वाचे आहेत: (अ) व्यक्तिने स्वतःच्या इच्छा, श्रद्धा आणि ध्येय, यांच्या अनुसार जीवन जगणे. (ब) त्यांचे मूल्यांकन करुन पुनर्मांडणी करणे, आणि (क) पर्यायी मार्ग स्वीकारण्याची तयारी ठेवणे.

भेदभाव न करणे म्हणजे समता होय. समाजात अनेक अहितकारी घटना घडतात वा घटक निर्माण होतात. त्यांची झळ अशाही लोकांना पोहोचते की जे त्या घटक निर्माण होण्यासाठी जबाबदार नसतात. अशा लोकांना न्याय देणे म्हणजे समता होय. या प्रतिकूल परिस्थितीत व्यक्तिच्या आवश्यक हितसंबंधांचे रक्षण झाले पाहिजे. पण स्वातंत्र्याची समान संधी असल्याशिवाय समता किंवा स्वातंत्र्य यांपैकी काहीही साध्य करता येत नाही.

समता आणि स्वातंत्र्य या दोन्ही संकल्पना परस्परसंगत आहेत असे अनेक विचारक मानतात. लॉकच्या मते, स्वातंत्र्यासहित अन्य नैसर्गिक हक्क हे समानतेवर आधारित असलेल्या नैसर्गिक कायद्याने नियंत्रित होतात. रॉल्सच्या मते, स्वातंत्र्य अथवा सामाजिक साधनांचे वितरण करण्याची कोणतीही यंत्रणा ही समानतेच्या आधारावरच असली पाहिजे.

## ■ स्वातंत्र्य आणि अधिकार :
**(Liberty And Rights)**

हॉब्ज, लॉक तसेच नोझिकप्रमाणे अनेक पाश्चात्य विचारक अधिकार आणि स्वातंत्र्याच्या संकल्पनांना समान मानतात. पण आज या दोन विभिन्न संकल्पना आहेत असे मानले जाते. पारंपारिक दृष्टीकोनात कृती करण्याचा अधिकार म्हणजेच कृतीस्वातंत्र्य आहे असे मानले गेले. नंतर असा मतप्रवाह निर्माण झाला की, स्वातंत्र्य आणि अधिकारांच्या संकल्पना समान नाहीत. पण मर्यादित अर्थाने अधिकार हे स्वातंत्र्य आहे. दुसऱ्या शब्दात अधिकार हे कायद्याने संरक्षित असलेले आणि मान्य असलेले स्वातंत्र्य आहे.

अधिकार आणि स्वातंत्र्याच्या संकल्पनांमध्ये तीन महत्वाचे भेद आहेत: (अ) अधिकार हा एखादी कृती करण्याच्या संदर्भात दिला जातो, तर एखाद्या गोष्टीपासून स्वातंत्र्य मिळते. (ब) स्वातंत्र्य कमी-अधिक

Scanned with CamScanner

प्रमाणात असू शकते, पण अधिकार कमी-अधिक असू शकत नाही. (क) अधिकाराप्रमाणे स्वातंत्र्य हे दुसऱ्याला प्रदान करता येत नाही, हस्तांतरित करता येत नाही अथवा त्याचा त्याग करता येत नाही.

## ■ भारतात स्वातंत्र्याची संकल्पना ■
### (The Concept of Liberty in India)

भारतात 'स्वातंत्र्याच्या' समानार्थी शब्द म्हणजे 'मुक्ती' होय. पण हा शब्द आध्यात्मिक अर्थ आहे. पारंपारिक अर्थाने 'मोक्ष' किंवा 'पुनर्जन्माच्या चक्रातून सुटका' म्हणजे 'मुक्ती' होय. पण सामाजिक बंधनातून मुक्ती असा त्याचा अर्थ मात्र अपेक्षित नव्हता.

ब्रिटीश राजवटीच्या काळात भारतात स्वातंत्र्याची संकल्पना तीन मार्गांनी आली - ब्रिटिशांनी व्यक्तिचे अधिकार आणि स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी केलेल्या कायद्यातील तरतुदी, पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीचा प्रसार आणि पाश्चिमात्य सामाजिक विचारांचा पडलेला प्रभाव. मध्यमवर्गाचा उदय आणि अपारंपारिक नोकऱ्या निर्माण झाल्याने स्वातंत्र्याचा व्यक्तिच्या संदर्भात विचार होऊ लागला. संयुक्त कुटुंबपद्धतीत स्त्रियांना दुय्यम स्थान न राहता बरोबरीचे मानले जाऊ लागले. काही संघटनांच्या माध्यमातून धार्मिक क्षेत्रातदेखील स्वातंत्र्यासंबंधी मंथन होऊ लागले. नवे शैक्षणिक उपक्रम, क्रीडा उपक्रम चालविण्यासाठी तसेच महिलांचा सामाजिक सहभाग वाढविण्यासाठी अनेक स्वयंसेवी संघटना स्थापन झाल्या. पण या संघटनांमध्ये प्रवेश मात्र केवळ उच्चभ्रू व श्रेष्ठीजन वर्गापुरता मर्यादित होता. भारतातील दोन थोर समाजसुधारक - रविंद्रनाथ टागोर आणि राजा राममोहन रॉय हे श्रेष्ठीजन वर्गातून आले होते.

पण पश्चिम भारतात ज्योतिबा फुले आणि नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर या खालच्या जातीतील विचारकांनी जातिव्यवस्था मोडून काढण्यासाठी सामाजिक स्वातंत्र्याचा प्रखरतेने पुरस्कार केला. त्याचा परिणाम असा झाला की दैनंदिन जीवनात निम्नजातीमुळे मिळणाऱ्या अपमान व अवहेलनेचा अंत करण्यासाठी स्वातंत्र्याचा उच्चार होऊ लागला. त्याचे दोन पैलू होते. पहिला म्हणजे श्रेष्ठवर्णीयांच्या वर्चस्वापासून निम्न जातीयांची मुक्तता, आणि दुसरा म्हणजे ब्रिटीश प्रशासनव्यवस्थेत नोकऱ्या मिळविण्यासाठी प्रयत्न. या विचारप्रवाहाचा राष्ट्रवादी विचारप्रवाहाशी संघर्ष होणे स्वाभाविक होते. पण विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात वसाहतवादापासून स्वातंत्र्य प्राप्त करण्याच्या संकल्पनेला बळकटी प्राप्त झाली.

महात्मा गांधींनी या दोनही विचारप्रवाहांना आपल्या विचारांमध्ये स्थान दिले. त्यांनी स्वातंत्र्यासाठी 'स्वराज' ही संकल्पना स्विकारली. 'स्वराज' या संकल्पनेत दोन घटक अंतर्भूत आहेत- एक म्हणजे 'स्व' आणि दुसरे 'राज'. दुसऱ्या शब्दात 'स्वत:वर राज्य' म्हणजे 'स्वराज' आहे. स्वराज्यप्राप्ती ही समस्त भारतीयांची संवैधानिक आणि राजकीय मागणी होती. त्याचबरोबर तिला सामाजिक मूल्यही होते. या मागणीमध्ये केवळ ब्रिटीश सत्तेपासून स्वातंत्र्य अपेक्षित नव्हते तर पाश्चीमात्य सांस्कृतिक वर्चस्वापासून मुक्ती अपेक्षित होती.

गांधीजींनी आपल्या 'हिंद स्वराज' या पुस्तकात 'स्वराज' या संकल्पनेवर प्रकाश टाकला. ते म्हणतात, 'जेव्हा आपण स्वत:वर राज्य करु तेव्हा ते स्वराज होईल.' या दृष्टीने 'स्वराज' म्हणजे मानवी मूल्यांना पायदळी तुडविणाऱ्या सत्तांपासून स्व-प्रतिष्ठा परत मिळविणे होय. व्यक्तिने स्वयंशासित होऊन स्वत:च्या क्षमतांचे आकलन करावे हे गांधीजींना अपेक्षित होते. स्वराजप्राप्तीसाठी प्रत्येक व्यक्तिला स्वत:ची जाणीव होणे आणि त्याचा समाजाशी असलेला संबंध कळणे महत्त्वाचे आहे. 'स्वराज' स्थापनेकरिता लोकांनी विविध संस्कृती, परंपरा आणि नैसर्गिकता यांनी युक्त असलेल्या संस्था, संरचना आणि प्रक्रियांची स्वतंत्रपणे निर्मिती करणे आवश्यक आहे. गांधीजींच्या मते, अशा संस्थांमधून व्यक्ती आणि समाजाचा विकास साध्य होईल, आणि त्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल.

Scanned with CamScanner

## ■ स्वातंत्र्य आणि भारतीय संविधान ■
### (Liberty & Indian Constitution)

भारतीय संविधानात तिसऱ्या भागात मूलभूत अधिकारांतर्गत स्वातंत्र्याचा समावेश करण्यात आला आहे. हे अधिकार राज्याचे सकारात्मक निर्देश नसून मूलतः नकारात्मक स्वरूपाचे आहेत. हे मूलभूत अधिकार असूनही पूर्णतः प्राप्त नाहीत. व्यक्तिस्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार म्हणून उल्लेख आहे त्याचबरोबर राज्याच्या नीतिनिर्देशक तत्वांमध्येसुद्धा स्वातंत्र्याला संरक्षण प्राप्त आहे.

संविधानाच्या तिसऱ्या भागात १९व्या कलमात विविध स्वातंत्र्यांचा उल्लेख करण्यात आला आहे तर २१ व्या कलमात या स्वातंत्र्यांवरील मर्यादा स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

२१व्या कलमात - कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धतीखेरीज कोणत्याही व्यक्तिचे जीवित, व व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही हे स्पष्ट केले आहे. मूलभूत अधिकारांमध्ये २१ वे हे एकमेव कलम असे आहे, जे लागू होण्यासाठी कोणताही अपवाद किंवा पात्रता सांगण्यात आलेली नाही. त्यामुळे परकीय नागरिक सुद्धा २१व्या कलमाचा आधार घेऊ शकतो. जीवित तसेच व्यक्तिस्वातंत्र्यासाठी नागरिकत्व ही अट घालण्यात आलेली नाही. त्यामुळे भारतीय संविधानाने व्यक्तिस्वातंत्र्याला मानवाधिकाराचा दर्जा प्राप्त करून दिला आहे.

## ■ भारतातील न्यायपालिका आणि २१वे कलम :

संवैधानिक कायद्यामध्ये प्रत्येक संभाव्य परिस्थितीचा वा खटल्याचा विचार होणे शक्य नाही. त्यामुळे एखाद्या खटल्यामध्ये संवैधानिक कायद्याचा अर्थ स्पष्ट करणे हे न्यायपालिकेचे कार्य आहे. न्यायालयाच्या निर्णयांना 'न्यायालयीन कायदा' (Case Law) असे म्हटले जाते. हे निर्णय खटल्यातील संबंधित पक्षांना लागू होतात. ते भविष्यात संवैधानिक कायद्याप्रमाणेच लागू होतात. थोडक्यात, न्यायालयीन निर्णयाने एखाद्या खटल्याचा निकाल लागतो. तसेच न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात सर्व व्यक्तिंना तो निर्णय भविष्यातही लागू होतो.

भारतातील न्यायालयांनी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा अन्वयार्थ लावून तो कसा लागू केला हे पाहणे औचित्यपूर्ण आहे. स्वातंत्र्य या संकल्पनेचे विविध आयाम केवळ अमूर्त स्वरूपात न राहता ते कायद्याचा अंमल होताना प्रत्यक्षात कसे उतरतील असा प्रयत्न भारतीय न्यायालयांनी सातत्याने केला आहे. स्वातंत्र्याच्या संकल्पनेसंबंधी अनेक न्यायालयीन कायदे भारतीय न्यायालयांनी केले आहेत. या निर्णयांनी जीवित तसेच व्यक्तिस्वातंत्र्याची कक्षा रुंदावण्याचे मोलाचे कार्य केले आहे. ह्याची चार ठळक उदाहरणे सांगता येतील.

१९६३ मध्ये खडकसिंग खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, 'संचारस्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या संदर्भात जेथे प्रत्यक्ष आणि स्पष्ट उल्लंघन होत असेल, त्यांचाच विचार केला जाईल. केवळ व्यक्तिच्या भावना वा संवेदना जपणे हे संविधानकर्त्यांचे उद्दिष्ट नव्हते.' याचा अर्थ प्रारंभी न्यायपालिकेने स्वातंत्र्याच्या संदर्भात केवळ प्रत्यक्ष उल्लंघनापुरती आपली भूमिका स्पष्ट केली.

पण १९८१ मध्ये फ्रांसीस कोरॉली मुलिन वि. दिल्ली केंद्रशासित प्रदेश या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्वातंत्र्याचा अधिक व्यापक अर्थ स्पष्ट करून सांगितले की, जीवित स्वातंत्र्यामध्ये प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार समाविष्ट आहे. तसेच जीवनाच्या मूलभूत गरजा उदा. पोषक आहार, वस्त्र, निवारा, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि संचारस्वातंत्र्य यांचाही समावेश होतो.

१९८४ मध्ये बंधुआ मुक्ति मोर्चा खटल्याच्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने राज्याच्या नीतिनिर्देशक

Scanned with CamScanner

तत्त्वांच्या संदर्भात २१व्या कलमाचा अर्थ स्पष्ट केला. त्यामध्ये असे नमूद केले की, २१व्या कलमातील प्रतिष्ठेने जीवन जगण्याच्या अधिकारामध्ये श्रमिकांच्या आरोग्याची देखभाल; बालकांची शारीरिक छळापासून मुक्ती तसेच त्यांना विकासाची संधी व सुविधा; उत्तम शैक्षणिक सुविधा, मातृत्वाची देखभाल आणि कामासाठी पोषक वातावरण निर्मिती या सर्वांचा समावेश होतो.

१९८९ मध्ये रामशरण वि. भारत सरकार या खटल्याचा निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने २१व्या कलमातील समग्र अर्थ स्पष्ट केला की, मनुष्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त करुन देणाऱ्या परंपरा, संस्कृती, वारसा आणि त्यांचे पूर्ण संरक्षण हे २१व्या कलमाच्या कक्षेमध्ये समाविष्ट आहे. १९९१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्रदूषण मुक्त पाणी आणि हवा मिळण्याच्या अधिकारालादेखील २१व्या कलमात समाविष्ट करावे हे स्पष्ट केले.

## चर्चेकरिता मुद्दे :

१. आपण जीवनात वेगवेगळ्या पर्यायांची निवड करतांना किती प्रमाणात स्वातंत्र्याचा उपयोग करतो? स्पष्ट करा.

२. मार्क्सच्या मते भांडवलवाद व्यक्तिच्या व्यक्तिमत्व अविष्कारात अडथळा निर्माण करतो. तुमच्या मते व्यक्तिला स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा अविष्कार करण्यासाठी सर्वाधिक स्वातंत्र्याची हमी कोणती विचारधारा देते?

३. हुंडापद्धतीचा प्रतिकार करणे ही काळाची गरज आहे. याकरिता आपण मिलचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य तसेच सामाजिक सक्ती यासंबंधी असलेल्या विचारांचा उपयोग करू शकतो काय?

४. भारतीय न्यायव्यवस्थेचे केलेले निर्णय आणि राजकीय सिद्धांतातील स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा विकास यांच्यामध्ये परस्परसंबंध आहे काय?

Scanned with CamScanner

प्रकरण ४

# समता

अशोक आचार्य

**रुपरेषा :**

- विषय प्रवेश
- संकल्पनेचा विकास
- समता का आवश्यक आहे?
- समता कशी असावी?
- समतेचे राजकारण

Scanned with CamScanner

# विषय प्रवेश

या जगातील लोकांमध्ये असंख्य प्रकारच्या विषमता आहेत. जगात अनेक धर्म, वंश, जातीचे लोक राहतात. त्यांची शारीरिक, आनुवंशिक आणि बौद्धिक क्षमता विविध स्वरूपाची आहे. लोकांचे जीवन जगण्याचे मार्ग देखील वेगवेगळे आहेत. त्यामुळे मानवी जगात विषमता सर्वत्र आढळून येते ही वस्तुस्थिती आहे.

तरीपण आपण असे मानतो की, सर्वजण समान आहेत. समाजातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संरचनांमध्ये समता असणे आवश्यक आहे. आपल्याला समतेची वागणूक मिळावी याकरिता आपण समतेचे समर्थन करतो. पण समान वागणूक म्हणजे काय? ब्राह्मण-दलित, काळा-गोरा, स्त्री-पुरुष असा कोणताही भेदभाव न करता सर्वजण समान आहेत याचा अर्थ काय होतो? विचार अभिव्यक्तिसाठी भाषेचा वापर, प्रजोत्पादन क्षमता, सामूहिक जीवन- हे सर्व मानवामध्ये समानतेने आढळून येते. पण येथे एवढाच अर्थ अपेक्षित नाही. आपली सुख-दुःख कळण्याची क्षमता, दुसऱ्यांप्रती प्रेम आणि त्यासाठी यातना सहन करण्याची तयारी यादेखील सर्वांमध्ये मूलभूत स्वरूपात आढळून येणाऱ्या समानता आहेत. या समानतांना नैतिकतेचा आयाम आहे. याशिवाय मानवाला एकमेकांशी जोडणारी काही अन्य वैशिष्ट्येदेखील आहेत. त्यामध्ये 'आत्मसन्मानाची इच्छा' ही महत्त्वाची आहे. यामुळे मनुष्य पराधीन न राहता स्वतःच्या ध्येयपूर्तीसाठी अखंड झटतो. थोडक्यात, आपल्या समतेच्या भावनेच्या पाठीशी आपल्या सर्वांचे सामूहिक अनुभव आहेत. त्यामुळे आपल्याला समाजव्यवस्थेतील विषमतेविरुद्ध संघर्ष करण्याची आवश्यकता व महत्त्व समजून येते. आपण न्याय, स्वातंत्र्य यांसारख्या मूल्यांप्रमाणेच समतेच्या मूल्यांच्या कसोटीवर राजकीय निर्णय तपासून पाहतो. तसेच राजकीय दृष्टीकोन आणि कृतींचे समर्थन वा निषेध करतो.

समतेची संकल्पना ही प्रमाणवादी राजकीय सिद्धांतामध्ये अत्यंत महत्त्वाची आहे. सामान्यतः समता दोन अथवा त्यापेक्षा लोकांच्या जीवनातील एखाद्या पैलूविषयी असलेले संबंध आहेत. पण समतेची संकल्पना ही इतकी सहज आणि सुलभ नाही. व्यक्ति-व्यक्तिंमधील संबंध कसे असावेत यांवर मत मांडणे सोपे नाही. हे संबंध निश्चित करण्याचा कोणताही एक मार्ग नाही. या संबंधाचे अंतिम ध्येय वा उद्दिष्ट काय असावे हेसुद्धा निश्चित नाही. कारण हे करण्यासाठी अनेक मार्ग आहेत. म्हणून समतेची संकल्पना अनेक रूपे धारण करू शकते.

## ■ संकल्पनेचा विकास ■

राजकीय तत्वज्ञानाच्या इतिहासात समतेच्या संकल्पनेचे अनेक ठिकाणी संदर्भ आढळून येतात. प्राचीन ग्रीक संस्कृतीपासून २०व्या शतकापर्यंत समतेच्या संकल्पनेने मानवी भावनांना सातत्याने जागृत केले आहे. गेल्या अनेक शतकांमध्ये या संकल्पनेत स्थित्यंतरे घडून आलेली आहेत. जुलमी आणि अनियंत्रित राजेशाही, विषम सामाजिक परिस्थिती तर कधी गैरलोकशाही सत्तांच्या विरुद्ध अगणित लोकांनी जगभरात केलेल्या संघर्षांमुळे समतेच्या संकल्पनेला आकार प्राप्त झाला आहे.

ॲरिस्टॉटल, हॉब्ज, रूसो, कार्ल मार्क्स आणि टॉकव्हिल (Tocqueville) या विचारवंतांनी समतेच्या संकल्पनेला आकार देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे आपण प्रामुख्याने त्यांचा विचार करूया.

Scanned with CamScanner

टॉकव्हिलने आपल्या 'डेमॉक्रसी इन अमेरिका' या ग्रंथात लिहीले की, मानवाच्या इतिहासामध्ये समतेचा प्रसार आणि प्रगती हा अत्यंत प्रबल आणि अपरिहार्य पैलू आहे. सार्वत्रिकता आणि चिरंतनता ही या प्रगतीची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. म्हणून या संकल्पनेचा प्रवास कसा झाला हे पाहणे उद्‌बोधक आहे.

## ■ ॲरिस्टॉटल

आपणास माहीत आहे की प्राचीन ग्रीसमधील नगरराज्यांमध्ये नागरिकांना प्रशासनामध्ये महत्त्वाचे व समान स्थान होते. ॲरिस्टॉलने रचलेल्या अथेन्सच्या संविधानात लोकशाही आदर्शांना प्राप्त करण्यासाठी आणि समतेच्या निर्मितीसाठी अनेक सुधारणा प्रारंभ केल्याचे उल्लेख आहेत. या सुधारणांमध्ये प्रामुख्याने सामाजिक जीवनातील विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यांचा मुख्य उद्देश सरदार आणि उच्चकुलीनांचे सत्ता, मानमरातब आणि जमीन यांवरील वर्चस्व संपुष्टात आणणे हा होता. कायद्याने निर्मित समता ही लोकशाही राज्यातील आवश्यक अट मानण्यात आली होती. प्राचीन अथेन्समध्ये 'डेमॉक्रशीया' (demokratia) याला 'आयसोनोमिया' (isonomia) हा प्रचलित समानार्थी संज्ञा होती. त्याचा अर्थ कायद्यासमोर आणि त्याच्या अंतर्गत सर्वांना समानता असा होता. त्यामुळे राज्यातील अनेक गरीब लोकांनादेखील राजकीयदृष्ट्या समान सहभागाचा हक्क प्राप्त होणे शक्य होते.

पण प्राचीन अथेन्समध्ये परकीय, गुलाम आणि स्त्रिया या तीन वर्गांना नागरिकतेपासून वंचित ठेवण्यात आले होते. ॲरिस्टॉटलने त्याचे समर्थनही केले. याचा अर्थ ॲरिस्टॉटलची समतेची संकल्पना ही केवळ 'नागरिकांपुरती' मर्यादित होती. त्याची राजकीय समतेची संकल्पना ही 'शासक आणि शासित' या धारणेवर आधारलेली होती. 'पॉलिटिक्स' या ग्रंथात ॲरिस्टॉटलने न्याय आणि समता यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट केला. तो म्हणतो की, 'समतेने न्याय निर्माण होतो. पण तो केवळ समानांसाठी असून सर्वांसाठी नाही. त्याचप्रमाणे विषमता ही देखील न्याय्य आहे, पण ते केवळ विषम लोकांना लागू असून सर्वांना नाही'. हे 'औपचारिक समतेचे' (formal equality) पहिले विधान आहे असे मानता येईल. ॲरिस्टॉटलने असे मानले की शासक-शासित ही नैसर्गिक विषमता आहे. कारण निसर्गानेच शासक आणि शासित हा भेद निर्माण केला आहे. शासकवर्गात असण्यासाठी व्यक्तिमध्ये बौद्धिक आणि प्रशासकीय क्षमता असणे आवश्यक आहे. शासक आणि शासितांमधील विषमतेचे ॲरिस्टॉटलने समर्थन केले आहे.

## ■ थॉमस हॉब्ज

ॲरिस्टॉटलने नैसर्गिक विषमतेला योग्य मानले. पण याउलट हॉब्जने मात्र निसर्गावस्थेत सर्व मनुष्य निसर्गत: समान आहेत असे मानले. आपल्या 'लेव्हियाथन' (Leviathan) या ग्रंथात हॉब्जने लिहीले की, निसर्गाने शारीरिक आणि बौद्धिक दृष्ट्या सर्वांना समान निर्माण केले आहे. एखादी व्यक्ति शरीर व बुद्धीने इतरांपेक्षा सरस असेल तरीही सर्वांना समानच समजण्यात यावे.

हॉब्जच्या मते एखादी दुबळी व्यक्ती कट कारस्थानाने आपल्यापेक्षा शक्तिशाली व्यक्तिला मारू शकते. तसेच सर्वांनाच अनुभवातून शहाणपण आलेले असते. सर्वच व्यक्तिंमध्ये आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्याची समान आकांक्षा असते. तसेच सर्वांमध्ये शक्ती प्राप्त करण्याची समान ऊर्मी असते. पण शक्ती प्राप्त करुन स्वत:चे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याच्या स्पर्धेतून समानतेला धोका निर्माण होतो. व्यक्ती एकमेकांवर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. शक्ती प्राप्तीच्या लालसेमुळे मनुष्य शांत व सुरक्षित जीवनाला मुकतो आणि दुष्टचक्रात सापडतो. जोपर्यंत सर्व व्यक्ती राजकीय अधिसत्तेला आपल्या शक्तिचा वाटा देणार नाहीत, आणि त्या अधिसत्तेच्या अंतर्गत सुसंस्कृत व समानतेचे जीवन स्विकारणार नाहीत,

Scanned with CamScanner

तोपर्यंत ते सुखी व सुरक्षित होणार नाहीत. हॉब्जने नैसर्गिक समतेच्या संकल्पनेत राजकीय सत्ता वगळून धार्मिक व अन्य सत्तांपासून व्यक्ति स्वतंत्र असावी हा महत्वपूर्ण विचार मांडला आहे.

## रुसो

रुसोने आपल्या 'डिसकोर्स ऑन दि ओरीजीन अॅन्ड फाऊंडेशनस् ऑफ इनइक्व्यॅलिटी' या ग्रंथात मानसशास्त्र आणि सामाजिक संस्थांच्या इतिहासावर विचार मांडले आहेत. त्यामध्ये रुसोने मानवामधील विविध विषमतांवर प्रकाश टाकून 'कृत्रिम' आणि 'नैसर्गिक' विषमता कोणत्या आहेत याचे विश्लेषण केले आहे. रुसोने समाजाचे विश्लेषण आणि विषमतेचे उगमस्थान यांवर इतिहासकथनाच्या स्वरुपात विचार मांडले आहेत. त्याच्या मते, निसर्गावस्थेत मनुष्य जीवनात भूतदया आणि स्व-संरक्षण ही दोन तत्त्वे होती. या अवस्थेत मनुष्य सुख-दुःखांचा विचारसुद्धा करीत नसे. त्याच्या गरजा कमी होत्या आणि तो सुखी होता. नैसर्गिक संकटांनी मानवी समूहांना स्थलांतर करण्यास भाग पाडले. त्यामुळे या समूहांचा परस्परांशी संपर्क निर्माण होऊ लागला. परिणामतः मनुष्याचे प्राथमिक स्वरुपात समाज व छोटे समूह तयार होऊ लागले. नव्या गरजा निर्माण झाल्या आणि मनुष्य निसर्गावस्थेतून वेगळ्या दिशेने वाटचाल करु लागला. समूहजीवनामुळे मानवामध्ये नव्या नकारात्मक भावना आकार घेऊ लागल्या. मनुष्य स्वतःची तुलना दुसऱ्यांशी करु लागला. स्वतःला सुखी करण्यासाठी मनुष्य इतरांवर वर्चस्व गाजवू लागला.

रुसोच्या मते, मनुष्याच्या स्वार्थी प्रवृत्तीतून खाजगी मालमत्तेची संकल्पना उदयास आली. तसेच समाजात श्रमविभाजनही होण्यास प्रारंभ झाला. खाजगी मालमत्ता आणि श्रमविभाजनामुळे वर्चस्वशाली वर्गाने गरीबांचे शोषण सुरु केले. रुसोच्या मते, ही अन्याय्य परिस्थिती गरीब लोकांमध्ये असंतोष निर्माण होण्यास कारणीभूत ठरली. त्यांनी धनिकांविरुद्ध प्रतिकाराचे शस्त्र उपसणे स्वाभाविक होते. परंतु जेव्हा धनिकांच्या ही वस्तुस्थिती ध्यानात आली, तेव्हा त्यांनी गरीबांना भ्रामक व खोटे आश्वासन दिले की, त्यांना समान हक्क असलेल्या राजकीय समाजात सामील करुन घेतले जाईल. खाजगी मालमत्तेच्या हक्काला सार्वत्रिक मान्यता प्राप्त होणे आवश्यक होते. त्यामुळे धनिक वर्गाने असा विचार प्रसारीत करण्यास सुरुवात केली की, गरीबांना शोषणापासून मुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे, महत्वाकांक्षी लोकांना अंकुश लावावा आणि आपल्या स्वतःजवळ असलेल्या संपत्तीचे संरक्षण करावे. गरीब व भोळ्या जनतेला स्वातंत्र्य मिळेल असे वाटून त्यांनी त्या राजकीय व्यवस्थेला स्विकारले. पण त्यांना दडलेल्या धोक्यांची अजिबात कल्पना नव्हती. धनिकवर्गाने गरीबांना समतेचा अधिकार तर दिला नाहीच पण आपला शोषणाचा हक्क मात्र मान्य करवून घेतला. त्यामुळे नागरी समाजात कृत्रिम विषमता ही स्थायी स्वरुपात निर्माण झाली.

रुसोच्या मते कृत्रिम विषमतेमुळे सामाजिक संबंधांचे आयामदेखील बदलत जातात. सर्वप्रथम समाजात खाजगी मालमत्ता व कायद्याची स्थापना झाल्यापासून श्रीमंत व गरीब ही भेदपूर्ण वर्गव्यवस्था आपोआप मान्य झाली. दुसऱ्या टप्प्यात न्यायव्यवस्था निर्माण झाल्याने सबल आणि दुर्बलांमधील संबंध निश्चित होऊ लागले. शेवटच्या टप्प्यात अधिमान्य सत्तेचे जुलमी व लहरी सत्तेमध्ये रुपांतर होऊन मालक व गुलाम ही व्यवस्था कायम झाली. रुसोच्या मते, धनिकलोक संपत्ती व मालमत्ता साठवितात आणि आपले वर्चस्व प्रस्थापित करतात. पण गरीबांसाठी मात्र गरीबीतून दुर्बलता आणि दुर्बलतेतून गुलामगिरी हे अटळ आहे. रुसोच्या मते, जेव्हा हे शोषणकारी व्यवस्था पराकोटीला पोहोचते, तेव्हा क्रांती घडून सत्तेचे पतन होते.

रुसोने असे मत मांडले की, केवळ शरीररचना आणि क्षमता यामुळेच व्यक्ति-व्यक्तिमध्ये नैसर्गिक भेद निर्माण होवू शकतो. पण आधुनिक समाजात कायदा व मालमत्तेच्या निर्मितीमुळे मनुष्य भ्रष्ट झाला

Scanned with CamScanner

आहे. त्यामुळे नैसर्गिक कायद्याशी विसंगत असलेल्या नव्या विषमता निर्माण होऊ लागल्या आहेत. त्यांना अन्याय्य आणि अस्विकारणीय विषमता मानले आहे.

## कार्ल मार्क्स

एका दृष्टिने विचार केल्यास मार्क्सचे समतेवरील विचार हे उदारमतवादी समतेवर केलेली टीका मानता येतील. मार्क्सने समकालीन समाजवादी विचारकांवर इतिहासाची भौतिकवादी संकल्पना लक्षात घेतल्याबद्दल टीका केली. प्रस्थापित वर्गाने स्वत:च्या हितांचे रक्षण करण्यासाठी जनमानसात जे गैरसमज निर्माण करुन ठेवले आहेत, ते दूर करणे आवश्यक आहे असे मार्क्सचे परखड मत होते. ऐतिहासिक कालखंडात अनेक संकल्पनांना एकत्र गुंफणारा जो वैचारीक धागा असतो तो शोधण्याचा प्रयत्न मार्क्सने आपल्या 'German Ideology' या ग्रंथात केला. त्याच्या मते, प्रत्येक समाजात सत्ताधारी वर्गाची विचारधारा रुढ झालेली असते. या ठिकाणी रुसो व मार्क्स यांच्या विचारांमधील समानता लक्षात घेण्यासारखी आहे. रुसोने श्रीमंतांच्या भ्रामक व फसव्या आश्वासनांना गरीब जनता कशी बळी पडते हे सांगितले होते. श्रीमंत वर्ग गरीबांकडून आपल्या सत्तेला मान्यता मिळविण्यासाठी ही फसवणूक करतात. मार्क्सनेसुद्धा असेच मत मांडले की, सत्ताधारी वर्ग शोषणकारी व्यवस्था कायम राखण्यासाठी अधिकृत व अधिमान्य विचारधारा निर्माण करतात. भांडवलशाही समाजात सत्ताधारी वर्गात श्रमविभाजन होऊन बौद्धिक आणि भौतिक श्रम असा भेद निर्माण होईल. त्यातून सत्ताधारी वर्गात 'विचारवंत' आणि 'भांडवलदार' असा भेद निर्माण होईल. विचारवंत हे सातत्याने जनतेमध्ये प्रस्थापित वर्गाविषयी भ्रामक विचार प्रसारित करण्याचे कार्य करतील. उदा. सरंजामशाहीच्या काळात मानमरातब, प्रतिष्ठा वा निष्ठा यांसारख्या भ्रामक संकल्पना प्रचलित होत्या, तर भांडवलशाहीत स्वातंत्र्य, समता यांसारख्या फसव्या शब्दजंजाळात जनतेला फसविले जाते. या संकल्पना सर्वत्र लोकप्रिय होतात. त्यांना जनता इतकेच नव्हे तर भलेभले विचारकही बळी पडतात. जोपर्यंत सर्वजण साम्यवादी दृष्टिकोन स्विकारणार नाहीत, तो पर्यंत या संकल्पना पोकळच राहतील.

कार्ल मार्क्सने अंतत: साम्यवादी आणि वर्गविहीन समाजाचे स्वप्न पाहिले. कारण शोषणकारी समाजव्यवस्थेमध्ये मनुष्याची दास्यत्व व शोषणापासून मुक्ति अशक्य आहे. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये आर्थिक विषमता वाढते आणि अधिक तीव्र होते. मार्क्सच्या मते, संक्रमणावस्थेमध्ये शोषणापासून मुक्ति पूर्णत: होणार नाही, पण उत्पादनाच्या साधनांमध्ये सर्वांचा समान वाटा मात्र निर्माण होऊ शकेल. या अवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तिला त्याच्या कार्यानुसार उत्पादनाच्या साधनात वाटा मिळेल. म्हणजे संक्रमणावस्थेमध्ये समाजवादाला उदारमतवादाची नैतिक भूमिका मान्य आहे. पण मार्क्सच्या मते साम्यवादाच्या अंतिम अवस्थेमध्ये 'प्रत्येक व्यक्तिला त्याची पात्रता आणि गरजांनुसार काम दिले जाईल.' व्यक्तिकडे केवळ उत्पादन करणारा घटक म्हणून पाहिले जाणार नाही तर इच्छा आणि गरजा असणारी व्यक्ति म्हणून पाहिले जाईल. साधनांचे वितरण करताना व्यक्तिच्या श्रमांपेक्षा इच्छा आणि गरजांचा विचार केल्या जाईल. साधनांचे वितरण हे प्रामुख्याने ज्या परिस्थितीमध्ये उत्पादन होते, त्या परिस्थितीवर अवलंबून आहे. साधनांचा अभाव आणि आर्थिक हितसंबंधाचा संघर्ष ही वर्गव्यवस्था असलेल्या समाजाची ठळक लक्षणे आहेत. पण साम्यवादी व्यवस्था स्थापन झाल्यानंतर हे सर्व काही संपुष्टात येईल.

## टॉकव्हिल

टॉकव्हिलने समतेच्या संकल्पनेकडे आधुनिक इतिहासातील एक प्रवृत्ति म्हणून पाहिले. त्याने

[illegible] राज्यक्रांतीचा अभ्यास करताना परिस्थितीजन्य समाजात लोकशाहीतील लोकशाही व्यवस्थेमध्ये कसे संक्रमण झाले याचे चिंतन केले. सामाजिक समता ही संकल्पना टॉकविलने [illegible] कशी कार्यरत राहते त्याचे अध्ययन केले. लोक पराधीनता आणि दास्यत्वातून मुक्ती मिळविण्यासाठी समतेचा पुरस्कार करतात. लोकशाहीची तुलना लोकशाहीशी करताना टॉकविल म्हणतो की, लोकशाहीत [illegible] राजकीय सर्व जण एका [illegible] असतात. पण लोकशाही व गुलामी सोडून सर्वांना दूर करते. लोकशाहीत लोक स्वातंत्र्यापेक्षा समतेला प्राधान्य देतात. या टॉकविलने अतिरेकी सर्वांविरुद्ध सामाजिकतेचा इशारा दिला आहे. कारण समतेसाठी जनतेमध्ये असणाऱ्या भावनांचा उन्माद [illegible] अनर्थ घडू शकतो. सामाजिक समतेचे राजकीय क्षेत्रावर काय परिणाम घडून येतील याबाबत टॉकविलने शंका व्यक्त केली आहे. लोकशाहीमध्ये समतेचा प्रकर्षाने पुरस्कार केला जातो हे खरे असले तरीही स्वातंत्र्याची किंमत चुकवून केवळ समतेचा पुरस्कार करणे हे लोकशाहीसाठी घातक ठरू शकते.

## ■ समता आवश्यक का असावी? ■

विषमता कमी करणे हे समतेच्या तत्त्वाचे मुख्य उद्दिष्ट मानले जाऊ शकते. सर्वांसाठी एकच मापदंड लावणे हा विषमता कमी करण्याचा एक मार्ग असू शकतो. पात्रता व क्षमतेचा विचार न करता सर्वांना समान वेतन दिले जाऊ शकते, अथवा कुटुंबाच्या आकाराचा विचार न करता सर्वांना एकसारखी घरे दिली जाऊ शकतात. पण त्यामुळे समस्या सुटण्याऐवजी वाढतील हे स्वाभाविक आहे. उदा. सर्वांना सारखे उत्पन्न देणे म्हणजे हुशार आणि मेहनती व्यक्तींच्या कष्टावर पाणी फिरविणेच होय. कोणाच्याही सामाजिक स्थानाचा विचार न करता सर्वांना समान उत्पन्न देण्यात यावे असे विधान कोणी करू शकणार नाही. तसेच परीक्षेतील कामगिरीचा विचार न करता प्रत्येक विद्यार्थ्याला एकच श्रेणी द्यावी असेही कोणी म्हणणार नाही.

वरील चर्चेवरून हे स्पष्ट आहे की, सर्वांना एकच मापदंड लावणे हे समतेचे उद्दिष्ट असू शकत नाही. परंतु जेथे न्याय्य व उचित प्रक्रियेचा प्रश्न येतो, तेथे मात्र एकच मापदंड लावणे योग्य व अपरिहार्य आहे. न्यायालयात, श्रीमंत असो वा गरीब असो, प्रत्येकाला समान वागणूक दिली जावी. न्यायदानाच्या प्रक्रियेत व्यक्तीच्या सामाजिक वा सांपत्तिक स्थितीचा विचार होऊ नये.

वर विविध उद्दिष्टांना प्राप्त करण्यासाठी समतेचे तत्त्व महत्त्वाचे आहे:

**(अ) कधी कधी न्याय्य (Just) स्थिती निर्माण करण्यासाठी समतेची आवश्यकता आहे**

जेव्हा कोणाला लाभ देण्याचा प्रश्न आहे, तेव्हा त्याचे विषम रितीने वाटप करणे चुकीचे आहे. जर दोन बुद्धिमान विद्यार्थ्यांनी परीक्षेत समान कामगिरी केली असेल तर त्यांना श्रेणी देण्यात भेदभाव करणे अन्याय्य आहे. तात्पर्य, न्याय्य स्थिती निर्माण होण्यासाठी समता आवश्यक आहे.

**(ब) व्यक्तीचा आत्म–सन्मान जपण्यासाठी काही प्रमाणात समता आवश्यक आहे**

समाजात वेगवेगळे स्तर आणि पदांवर लोक असतात. पण या विभिन्नतेचा परिणाम त्यांच्या मानवी व्यवहारावर होऊ नये. जर समाजात आपली किंमत होत नाही असे व्यक्तीला वाटू लागले तर त्याचा स्वाभिमान दुखावतो. व्यक्तीच्या मनात स्वतःबद्दल असलेली प्रतिमा आणि त्याच्याविषयी लोकांच्या मनात असलेली त्याची प्रतिमा यातील तफावत समजून घेणे आवश्यक आहे. व्यक्तीचा आत्मसन्मान जपण्यासाठी समाजातील भौतिक विषमता दूर करून सर्वांसाठी न्यूनतम भौतिक गरजा पूर्ण होतील अशी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

**(क) समता निर्माण होण्यासाठी व्यक्तीने इतरांचा आदर करणे आवश्यक आहे**

केवळ स्वतःचाच नव्हे तर इतरांचाही मान राखणे हे व्यक्तीचे कर्तव्य आहे. समाजातील व्यवहार आणि संबंधांमध्ये सर्वांना सम्मिलीत करून घेतल्यास समतेचे वातावरण निर्माण होऊ शकते.

Scanned with CamScanner

**(ड) बंधुत्वाची भावना वृद्धींगत होण्यासाठी समता आवश्यक आहे**

समाजात असलेले भेदभाव बाजूला सारुन संघटित होण्यासाठी समतेचे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. रेल्वे अथवा बसमधील प्रवासी आपल्यासोबत प्रवास करणाऱ्यांची जात वा धर्म काय आहे याचा विचार करीत नाहीत. जातीभेद व सांप्रदायिकता बाजूला ठेऊन लोक अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी एकत्र होतात, आपण समतेवर विश्वास ठेवतो म्हणूनच हे घडणे शक्य आहे. पण विषमता मित्रत्व, समुदाय आणि बंधुभावामध्ये अडथळे निर्माण करते.

वरील चारही मुद्दे परस्परपूरक आहेत. प्रत्येक मुद्यामध्ये समतेचे वेगवेगळ्या आधाराचा समर्थन केले आहे. ते पुढीलप्रमाणे-

(१) समाजात मूलभूत गरजांची पूर्तता होण्यासाठी न्याय्य वितरणातून पोषक परिस्थिती निर्माण होऊ शकते.

(२) व्यक्तिचा आत्म-सन्मान जपण्यासाठी 'स्थान आणि प्रतिष्ठेची समता' असणे आवश्यक असून त्यासाठी भौतिक विषमतेची तीव्रता कमी होणे आवश्यक आहे.

(३) सर्वांना व्यक्तित्व विकासाची समान संधी मिळण्यासाठी परस्परांचा आदर करणे महत्वाचे आहे आणि

(४) सामाजिक समता निर्माण झाली तर बंधुत्वाची भावना निर्माण होऊ शकते.

## ■ समता कशाची असावी? ■

समता कशाची असावी या मुद्द्यावर राजकीय तत्वज्ञानात बरेच मतप्रवाह आहेत. समतेचे तत्व मान्य करण्यापूर्वी आपल्याला नेमकी कोणती समता निर्माण करावयाची आहे हे स्पष्ट असले पाहिजे. विचारवंतांनी प्रामुख्याने समतेच्या तीन मापदंडांचा विचार केला आहे. कल्याणकारी समता, साधनांची समता आणि क्षमतांची समता. या सर्वांचा विचार करु या.

## ■ कल्याणकारी समता (Equality of Welfare)

उपयोगितावादी असे मानतात की, वितरणात्मक समतेतून जनहिताचे वितरण होऊ शकते. या ठिकाणी 'कल्याण वा हित' यातून दोन अर्थ स्पष्ट होतात. पारंपारिक उपयोगितावादी विचारवंतांच्या मते हित म्हणजे व्यक्तिला प्राप्त होणारे सुख होय. एखादी व्यक्ति आयुष्यात सुखी आहे की नाही हे पाहण्यासाठी ती आनंदी आहे कि नाही हे कळले पाहिजे. परंतु आधुनिक चिंतनामध्ये प्राथमिकतांची पूर्तता म्हणजे हित आहे. आपल्या प्राथमिकता कोणत्या आहेत हे ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य व्यक्तिला असावे.

समाजात साधनांचे वितरण होताना एका व्यक्तिला किती साधने प्राप्त झाली हे महत्वाचे नसून त्या साधनांनी व्यक्तिच्या गरजा पूर्ण होऊन तो सुखी झाला की नाही हे महत्वाचे आहे. म्हणजे साधनांच्या वितरणात विषमता असली तरीही प्रत्येकाचे हित मात्र साध्य झाले पाहिजे. महागडी कार वा गाडी खरीदणाऱ्या व्यक्तिला सायकल चालविण्यात आनंद मानणाऱ्या व्यक्तिच्या बरोबरीचे समजले पाहिजे. पण यातून काही प्रश्न निर्माण होतात. उदा. समाजाने श्रीमंतांचे चोचले पूर्ण करावेत काय? महागडी कार नाही म्हणून असंतुष्ट असलेल्या व्यक्तिला सामाजिक साधनांमध्ये एखाद्या साध्या सायकलधारकापेक्षा जास्त वाटा देणे योग्य आहे काय? म्हणून व्यक्तिंच्या विविध प्राथमिकतांना समान मानणे नैतिकदृष्ट्या धोकादायक आणि अव्यवहार्य आहे. सर्वांचे समान हित असावे या संकल्पनेतून न्याय निर्माण होत नाही. म्हणून अनेक उदारमतवाद्यांनी या संकल्पनेला अयोग्य व दोषपूर्ण मानले आहे.

Scanned with CamScanner

## ■ साधनांची समानता (Equality of Resources)

जॉन रॉल्स (John Rawls), रोनाल्ड डॉर्किन (Ronald Dworkin) आणि एरिक रॅकोवस्की (Eric Rakowski) या विचारवंतांनी 'साधनांच्या समानतेची' संकल्पना मांडली आहे. डॉर्किनच्या मते, साधनांचे वाटप अशा पद्धतीने वितरण व्हावे की, त्यामध्ये प्रत्येकाचा समान वाटा असावा. पण अशी समानता निर्माण कशी व्हावी हा प्रश्न आहे. त्यासाठी डॉर्किनने दोन टप्प्यांमधील प्रक्रिया सांगितली- (१) इच्छेनुसार लिलाव, आणि (२) विमा योजना. हे स्पष्ट करण्यासाठी डॉर्किनने एक काल्पनिक कथा सांगितली आहे.

एका बेटावर जहाज फुटल्यामुळे अडकलेले प्रवासी आहेत. त्या सर्वांमध्ये समान बुद्धीमत्ता आहे हे गृहीत धरू या. सर्वांनी असे ठरविले की, बेटावर असलेल्या नैसर्गिक साधनांचे आपल्यामध्ये समान वितरण केले पाहिजे. हे समान वितरण करून देण्यासाठी सर्वांनी मिळून आपल्यातील एका व्यक्तिची निवड केली. हे वितरण लिलाव पद्धतीने करण्याचे ठरले. प्रत्येकाने आपल्या ध्येयानुसार आवश्यक असलेल्या साधनासाठी बोली लावावी. प्रत्येकाला बोली लावण्यासाठी १०० शिंपली चलन म्हणून दिलेली आहेत. प्रत्येकाने आपल्या आवडीनुसार लिलावात बोली लावली. ज्याने जे साधन मिळविले त्याची तुलना दुसऱ्यांच्या साधनांशी करण्याची गरज नाही. प्रत्येकाला समान मानून त्याच्या आवडीनुसार साधन विकत घेण्याची मुभा देण्यात आली आहे.

पण या कथेत काही अडचणी आहेत. प्रत्यक्ष जीवनामध्ये सर्व व्यक्तिंमध्ये समान बुद्धीमत्ता व क्षमता असणे अशक्य आहे. जे शारिरीक दृष्ट्या अपंग वा अंध आहेत, त्यांच्यामध्ये सामान्य व्यक्तिमध्ये असलेली क्षमता असू शकत नाही. विकलांग व्यक्तिला विषम परिस्थितीला सामोरे जाण्यावाचून गत्यंतर नाही. अशा व्यक्तिपेक्षा धडधाकट व्यक्ति आपल्या साधनांचा अधिक सक्षमतेने उपयोग करतील.

डॉर्किनच्या मतानुसार, विकलांग वा अक्षम व्यक्तिंना लाभ देण्यासाठी लिलाव सुरु करण्यापूर्वीच उपाय करावे लागतील. त्यासाठी अशा व्यक्तिंना बक्षीस वा देणगीच्या स्वरुपात नुकसानभरपाई द्यावी लागेल. पण या योजनेतसुद्धा काही व्यावहारिक अडचणी आहेत. प्रत्येक विकलांग व्यक्तिला नुकसानभरपाई देणे कठीण आहे. काही व्यक्तिंची विकलांगता अशा गंभीर स्वरुपाची असते की त्याची नुकसानभरपाई देणे शक्य नसते. तर काही व्यक्तिंची विकलांगता किरकोळ असल्याने त्यांचा विचार करण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे सक्षम व्यक्तिला होणारा साधनांचा लाभ आणि विकलांग व्यक्तिंना भरपाई दिल्यामुळे त्यांचे झालेले नुकसान ह्यांच्यात संतुलन निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी डॉर्किनने विमा योजना सुचविली. त्याच्या मते, लिलाव सुरु होण्यापूर्वी प्रत्येक व्यक्ति आपल्याजवळील धनाचा काही वाटा बाजूला काढून ठेवेल. त्याचा उपयोग विकलांग व अक्षम व्यक्तिंसाठी केला जाईल. त्यानंतर लिलावाची प्रक्रिया सुरु होईल.

सारांश, आपण आदर्श परिस्थितीमध्ये कोणते ध्येय निश्चित करतो आणि प्रत्यक्ष व्यवहारात त्या ध्येयांचे स्वरुप कसे बदलत जाते हे दाखवून देणे डॉर्किनच्या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्याने सांगितलेल्या विमा योजनेप्रमाणे आजच्या व्यवहारात करपद्धती प्रचलीत आहे. गरीबांपेक्षा श्रीमंतांकडून अधिक कर घेऊन त्याचा लाभ दुर्बल घटकांना दिला जातो. तात्पर्य, 'साधनांची समानता' या संकल्पनेत लोकांच्या विषम परिस्थितीवर उपाय करण्याची जबाबदारी प्रामुख्याने राज्यावर देण्यात आली आहे.

## ■ कार्यक्षमतेची समानता (Equality of Capabilities)

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी उत्पन्न आणि साधनांच्या समतेपेक्षा कार्यक्षमतेच्या समतेवर

Scanned with CamScanner

अधिक भर दिला आहे. त्यांच्या मते, लोक ज्या स्वातंत्र्यांच्या मदतीने आनंद घेतात त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. उदा. वाचन करणे, सुदृढ राहणे, स्वाभिमानाने जगणे, राजकीयदृष्ट्या सक्रिय असणे, सामुदायिक जीवनात सहभागी होणे, इ. लोकांकडे किती साधने उपलब्ध आहेत याचा विचार करण्यापेक्षा त्यांना काय करावयाचे आहे यावर लक्ष केंद्रीत करणे महत्त्वाचे आहे. साधने व्यक्तिला केवळ जीवन जगण्याची हमी देतात. त्यामुळे त्यांना सुखी जीवनाची आवश्यकता मानता येते.

परंतु सेनच्या मते, 'सुख किंवा हित' या संकल्पनेकडे 'कार्य' (function) या दृष्टीने पाहिले आहे. उदा. व्यक्तिने प्राप्त केलेल्या उत्तम जीवनाकडे कार्य म्हणून पाहता येते. परंतु सामाजिक नीति वा धोरणे तयार करताना 'कार्यांचा' विचार न करता 'कार्यक्षमतेचा' विचार करणे आवश्यक आहे. विशिष्ट कार्य पूर्ण करण्याची क्षमता म्हणजे कार्यक्षमता होय. उदा. साक्षरता ही क्षमता आहे, तर वाचन हे कार्य आहे. ज्या समाजात अधिक निरक्षरता आहे, तेथे राज्याने साक्षरतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. जो मानवाच्या समाधानाचा आग्रह करतो असा विचारक निरक्षरता असलेल्या प्रदेश व राज्यात पुस्तके आणि अधिक शैक्षणिक सोयी उपलब्ध करून द्याव्यात असे म्हणेल. पण कार्यक्षमतेचा पुरस्कार करणारा विचारक असे प्रतिपादन करेल की, बाह्य सुविधा पुरविण्यापेक्षा लोकांमध्ये लेखन व वाचन क्षमता निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे.

सेन यांच्या मते, विषमतेचे विश्लेषण करण्यासाठी मानवी विविधतांना लक्षात घेतले पाहिजे. 'वय, लिंग, क्षमता, बुद्धीमत्ता' इ. व्यक्ति-व्यक्तिमध्ये विविधता आहे. त्यांना अंतर्गत (internal) विविधता मानता येईल. तसेच बाह्यत: मालमत्ता, सामाजिक पार्श्वभूमी, इ. आधारावर विविधता दिसून येतात. बाह्य घटकांचा अंतर्गत विविधतांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. उदा. ग्रामीण भारत तसेच चीनमध्ये पुरुष व स्त्रियांच्या मृत्युदरात बरीच मोठी तफावत दिसून येते, म्हणजेच लिंगभेद व पुरुषप्रधान सामाजिक संस्था या बाह्य घटकांचा स्त्रियांच्या संख्येवर परिणाम झाला आहे. यापुढे जाऊन जर आपण अन्य सामाजिक घटक आणि भेदांचा विचार केला तर विषमतेची तीव्रता प्रकर्षाने लक्षात येते, उदा. दलित समाजातील स्त्रियांचा मृत्युदर हा अन्य स्त्रीवर्गापेक्षा अधिक आहे. पण हा मुद्दा येथे पूर्ण होत नाही. कारण दिल्लीतील दलित स्त्रियांची स्थिती ही ग्रामीण राजस्थानमधल्या उच्चवर्णीय विधवांसारखी आहे काय? हा प्रश्न उपस्थित होतो. कोणी असे म्हणू शकेल की, अत्यंत कठोर सामाजिक बंधनांमुळे राजस्थानातील उच्चवर्णीय विधवांची स्थिती दलित स्त्रियांपेक्षा वाईट आहे. अशा विषमतांचा बारकाईने अभ्यास होणे आवश्यक आहे.

सेनच्या मते, धोरणकर्त्यांनी अशा विषमतांची अधिकाधिक माहिती गोळा करून लोकांची कार्यक्षमता समपातळीवर आणता येईल अशा स्वरूपाची धोरणे तयार करावीत. मानवी विविधतांचा सखोल विचार करूनच सामाजिक नितीनिर्धारण व्हावे.

## ■ समतेचे राजकारण (Politics of Equality) ■

२०व्या शतकात समतेच्या संकल्पनेचा उपयोग कल्याणकारी राज्याची संकल्पना दृढ करण्यासाठी झाला. पण गेल्या तीन दशकांपासून कल्याणकारी राज्याची संकल्पना मागे पडली आहे. त्यासंदर्भात थोडक्यात विचार करणे आवश्यक आहे. अनेक लोकशाही राज्यांमध्ये उजव्या पक्षांचा (Right Wing) राजकारणात उदय झालेला दिसून येतो. १९८० च्या दशकात रोनाल्ड रिगन आणि मार्गारेट थॅचर यांनी आपल्या कार्यकाळात कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेविरुद्ध कठोर पावले उचलली. ही संकल्पना खर्चिक ठरली आहे अशीही टीका करण्यात आली. कारण त्यामध्ये वैयक्तिक जबाबदारी, स्वावलंबित्व आणि आर्थिक क्षमता या मुद्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले. अप्रत्यक्षपणे करांचा भार कमी व्हावा यासाठी अनेक राज्यातील नागरिक उजव्या पक्षांना समर्थन देतात. जागतिक राजकारणाच्या पटावर उजव्या

Scanned with CamScanner

विभागणीला झुकते माप असल्याचे दिसून येते. शिवाय जागतिकीकरणाच्या रेट्याने कल्याणकारी राज्याची संकल्पना मावळली आहे.

आणखी एक राजकीय घडामोड लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे समूहांमध्ये पडत असलेला राजकीय संघर्ष. आता 'समता कशाची' यापेक्षा 'समता कोणाची' हा मुद्दा ऐरणीवर येऊ लागला आहे. उदारमतवादी विचारवंतांनीदेखील केवळ व्यक्तिवादाची कास न धरता अनेक गटांमध्ये असलेल्या विषमतेकडे लक्ष वळविले आहे. स्त्री, अल्पसंख्याक, दलित, भाषावादी, इ. अशा कितीतरी गटांचे समान हक्कांसाठी विविध स्तरांवर संघर्ष होत आहेत. त्यामुळे गटाभिमुख समता निर्माण करण्यासाठी नव्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

## चर्चेकरिता मुद्दे :

१. वर्ग प्रतिनिधी या नात्याने तुम्हाला महाविद्यालयातील व्यवस्थापन समितीने खालील विषयांवर चर्चा करण्यासाठी आमंत्रित केले आहे.

अ) विद्यार्थ्यांना सर्वाधिक आवडणाऱ्या इंग्रजी पाठ्यपुस्तकांचे मराठीमध्ये भाषांतर करणे.

ब) ग्रंथालयामध्ये अंध विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीची सुविधा उपलब्ध करून देणे.

क) महाविद्यालयीन परिसरात व्हीलचेयरची व्यवस्था करणे.

तुम्ही वरील विषयांचे समर्थन का व कसे कराल?

प्रकरण ८

# न्याय

कृष्णा मेनन

**रुपरेषा :**

विषय प्रवेश
वितरणात्मक न्याय
जॉन रॉल्सचा न्याय सिद्धांत
रॉल्सच्या सिद्धांताच्या मर्यादा
समुदायवादी टीका
स्त्रीमुक्तिवादी टीका
रॉल्सच्या सिद्धांताचा अमर्त्य
सेनद्वारे विस्तार
राज्याचा विलयवादी सिद्धांत
न्यायाचा स्त्रिमुक्तिवादी विचार

Scanned with CamScanner

# विषय प्रवेश

प्रस्तुत प्रकरणामध्ये न्याय या संकल्पनेचा स्वातंत्र्य आणि समता या संकल्पनांच्या संदर्भात विचार केला जाईल. दैनंदिन जीवनात न्यायाचा संबंध कायद्याशी जोडला जातो. पण सर्वच कायदे न्याय देणारे नसतात हे लक्षात घेतले पाहिजे. जगात अनेक राजकीय व सामाजिक चळवळी अन्यायकारी कायद्यांविरुद्ध झालेल्या आहेत. उदा. दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदकारी कायदे.

न्याय हा नेहमी निष्पक्ष असतो असेही सामान्यत: समजले जाते. आपण नेहमीच हिंदी चित्रपटांच्या दृश्यांमध्ये न्यायदेवता ही डोळ्यांवर पट्टी बांधून हातात न्यायाचा तराजू धरुन उभी असल्याचे बघतो. तात्पर्य, निष्पक्षता आणि प्रामाणिकता ही न्यायाची प्रमुख लक्षणे मानली जातात.

प्लेटोच्या 'रिपब्लिक' (Republic) या ग्रंथात न्यायाचा उल्लेख आढळतो. या ग्रंथातून प्लेटोने 'खऱ्या स्वरुपात' न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आणि आदर्श राज्याच्या निर्मितीचे स्वप्न पाहिले. प्लेटोच्या मते, मनुष्याच्या गुणांपैकी न्याय हा गुण आहे. शहाणपण, धैर्य आणि संयम हे अन्य तीन गुण आहेत. प्रत्येक मनुष्याने आपल्या गुणानुसार व्यवहार केल्यास आदर्श राज्य निर्माण होईल. या राज्यात प्रत्येकजण आपले कार्य चोखपणे बजावेल. पण प्लेटोच्या या संकल्पनेत स्त्रियांना स्थान नाही. ॲरिस्टॉटलच्या मते, समाजात समता, प्रमाणबद्धता आणि संतुलन निर्माण केल्यास न्याय प्रस्थापित होईल. म्हणजे प्लेटोची श्रेणीबद्ध न्यायाची संकल्पना ॲरिस्टॉटलने नाकारली.

ग्रीक तत्ववेत्त्यांनंतर न्यायाच्या संकल्पनेवर विशेष चिंतन झाल्याचे दिसून येत नाही. परमेश्वरी शक्ति अथवा प्रथापरंपरांच्या आधारावरच न्यायाची संकल्पना निर्धारित होत असे. परंतु पुनरुज्जीवनाच्या कालखंडापासून औद्योगिक क्रांतीपर्यंत युरोपखंडात अनेक परिवर्तने घडून आली. समाजात धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार होऊ लागला. तसेच न्यायाच्या नव्या संकल्पना उदयास येऊ लागल्या. आधुनिक राज्यात धर्मनिरपेक्षतेच्या चौकटीत न्यायाचा विचार होऊ लागला. न्याय हा धार्मिक तत्त्वे किंवा परंपरांवर आधारलेला नसून तो राज्याने लोकजीवन आणि व्यवहाराला सुनियंत्रित करण्यासाठी स्विकारलेली व्यवस्था आहे हे सर्वत्र मान्य होऊ लागले. आजदेखील 'न्याय म्हणजे काय?' या प्रश्नावर गांभीर्याने वाद आणि चिंतन होत आहे.

## ■ वितरणात्मक न्याय (The Issue of Distributive Justice) ■

राजकारणात 'कोणाला काय व का प्राप्त होते' हे महत्त्वाचे आहे. आपल्या देशात शालेय शिक्षण, अन्न, शुद्ध पिण्याचे पाणी, आरोग्यसेवा, इ. सर्व नागरिकांना उपलब्ध नाही. त्यांच्या वितरणाचा योग्य आधार काय असावा? सामान्यत: सेवा व उत्पादनाच्या वितरणासाठी बक्षीस किंवा शिक्षा, गुणवत्ता आणि गरज हे तीन आधार मानले जातात.

मनुष्याच्या कृतीमुळे त्याला एकतर बक्षीस मिळते नाही तर शिक्षा भोगावी लागते. बक्षीस वा शिक्षा हे मनुष्याने केलेल्या कृतीचेच फल आहे असे म्हणता येईल.

गुणवत्तेचा गौरव व्हावा हा दुसरा आधार आहे. पण परिक्षेत एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला तर त्याची तशी लायकी होती असे म्हटले जाते. पण हे घडू शकते की काही घरगुती समस्यांमुळे त्या विद्यार्थ्याला वर्गात हजर राहता आले नाही किंवा अभ्यासाकडे लक्ष देता आले नाही. मग असा विद्यार्थी अनुत्तीर्ण होण्याच्या लायकीचा आहे असे मानावे काय?

Scanned with CamScanner

दुसऱ्या शब्दात, व्यक्तिच्या कृती वा प्रयत्न हे समाजातील व्यवहारापासून वेगळे करता येत नाही. समाज कशाला योग्य आणि प्रशंसेस पात्र समजतो हेसुद्धा महत्त्वाचे आहे. उदा. असंख्य कामगार शहरात बांधकामाच्या कार्यात अपार कष्ट उपसताना दिसतात. पण एखाद्या क्रिकेटपटूपेक्षा त्यांना मिळणारे उत्पन्न खूप कमी आहे. म्हणूनच समाजात कोणाला प्रशंसा व बक्षीसपात्र मानले जाते हे पाहिले जावे.

तिसरा आधार 'गरजेचा' आहे. व्यक्तिच्या कार्यक्षमतेचा विचार न करता त्याच्या गरजा पूर्ण केल्या जाव्यात. हा आधार मान्य केल्यास सात मुले आणि वृद्ध माता-पित्याची जबाबदारी असलेल्या कर्मचाऱ्यास राहण्यासाठी प्रशस्त घर मिळेल. तर दुसरीकडे पत्नी व दोन मुले असलेल्या शल्यचिकीत्सकाला केवळ दोन बेडरुम असलेले घर मिळेल.

जर जगात साधनांची विपुलता असती तर कदाचित न्यायाचा प्रश्नच उद्‌भवला नसता. पण विपुलता नसल्यामुळे 'कोणाला काय व केव्हा मिळते' हा प्रश्न नेहमीच महत्वाचा आहे. राजकीय सिद्धांतामध्ये या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी दोन मार्ग स्विकारलेले आहेत- (१) प्रक्रियात्मक (२) सामाजिक न्याय.

न्यायाच्या संकल्पनेनुसार जर काही नियमांचे पालन केले तर न्यायाची पूर्तता होऊ शकते. न्याय हा केवळ व्यक्तिच्या व्यक्तिगत वर्तनाशी संबंधित असून त्याचा समाजाशी संबंध येत नाही. व्यक्ती आपल्या बुद्धिने स्वतः पर्याय निवडते. त्यामुळे आपल्या कृतीच्या परिणामांना व्यक्तिच जबाबदार आहे.

सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत न्याय हा समाजाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे व्यक्तिला काय मिळते वा मिळत नाही हे महत्त्वाचे नाही, तर समाजाने मान्य केलेला एखादा मापदंड न्याय्य आहे की अन्याय्य आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे. न्याय निर्माण करण्यासाठी राज्यसंस्थेचा उपयोगही होऊ शकतो. उदा. राज्य समाजातील एखाद्या विशिष्ट गटाला शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देऊ शकते. या व्यवस्थेत कोणी हस्तक्षेप केल्यास राज्य त्याविरुद्ध दंडात्मक पाऊल उचलू शकते.

## न्याय (Procedural Justice)

न्यायाच्या संकल्पनेत उत्पादन आणि वितरणात भेद मानण्यात आलेला नाही. याचा अर्थ असा की प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कृत्यांसाठी जबाबदार असून तिला वैयक्तिक स्वरुपात हक्क प्राप्त आहेत. येथे पूर्ण समाजाचा विचार करण्याची आवश्यकता नाही. राज्याला व्यक्तिच्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. प्रखर व्यक्तिवादावर आधारलेल्या या संकल्पनेत समाजाचे काही सामूहिक ध्येय वा उद्दिष्ट असू शकते हे मान्य केलेले नाही.

न्यायाची संकल्पना अत्यंत आकर्षक वाटते. कारण त्यामध्ये व्यक्तिला स्वायत्त व सामर्थ्यवान मानलेले आहे. तसेच आपल्या यशापयशासाठी व्यक्तिला जबाबदार धरलेले आहे. पण बारकाईने विचार केल्यास ही संकल्पना अडचणीची वाटते. उदा. या संकल्पनेनुसार कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत, त्यासाठी ते स्वतः जबाबदार आहेत. त्यांनी ते टाळण्यासाठी अधिक मेहनत करावयास हवी होती.

न्यायाचा बाजारपेठेतील अर्थव्यवस्थेशी संबंध नाही. कारण या संकल्पनेनुसार बाजारपेठेत हस्तक्षेप केला नाही तर बाजारपेठ साधनांचा सर्वोत्तम उपयोग करुन घेईल. म्हणून बाजारपेठेत कोणीही हस्तक्षेप करु नये. शिवाय हस्तक्षेप होत असेल तर तो 'गरज' वा 'बक्षीस' या आधारावरच होईल. पण न्यायाच्या समर्थकांना हे मान्य नाही. कारण समाजात गरजा कोणत्या आहेत आणि इनाम/ वा अनुदान रुपाने काय देण्यात यावे यावर एकमत होऊ शकत नाही.

रॉबर्ट नोझिकने 'Anarchy, State and Utopia' या ग्रंथात प्रक्रियात्मक न्यायाचे चांगले उदाहरण सांगितले आहे. त्याच्या मते, व्यक्तिने भूतकाळात केलेल्या कार्यावरुन तिला इनाम वा शिक्षा देण्यात यावी

Scanned with CamScanner

हे ठरविता येते. उदा. एखाद्या व्यक्तिने योग्य पद्धतीने मालमत्ता जमविली असेल तर त्याची मालकी न्याय्य आहे. फसवेगिरी वा धाक यांना कोठेही स्थान नाही. जर कोणी प्रामाणिकपणे बळाचा वापर न करता वैयक्तिक मालमत्ता जमविली असेल तर त्या मालमत्तेचे पुनर्वितरण करण्यात येऊ नये. या संबंधी राज्याची भूमिका मर्यादित असावी. नोझिकच्या मते, वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी हे आवश्यक आहे.

जोपर्यंत मालमत्तेवरील हक्क वा त्याची अदलाबदल ऐच्छिक आहे, तोपर्यंत त्यावर बंधने लादू नये. परंतु नोझीकच्या मते, जीवनावश्यक वस्तुंच्या हक्कावर मात्र एकाधिकार असू नये. उदा. वाळवंटात कोणी पाण्यावर हक्क दर्शवून ते वाटेल त्या किंमतीला विकू नये. नोझीकने राज्याच्या भूमिकेला मर्यादित करून व्यक्तिगत स्वायत्ततेला वाव दिला आहे. यामुळे व्यक्ती स्वतः पुढाकार घेऊन कार्य करेल असे त्याला वाटते. तात्पर्य, नोझीकने वैयक्तिक स्वातंत्र्याचे पूर्णतः समर्थन केले आहे.

## ■ जॉन रॉल्सचा न्याय सिद्धांत (Justice As Fairness) ■

जॉन रॉल्सने आपल्या 'Theory of Justice' या ग्रंथात प्रक्रियात्मक न्यायाला आधार मानले आहे. म्हणजेच न्याय निर्माण होण्यासाठी नियमांचे पालन आवश्यक आहे. नियमांचे पालन होत असले तरीपण अन्याय्य परिस्थिती निर्माण होऊ शकते ही वस्तुस्थिती रॉल्सने लक्षात घेतली. हे टाळण्यासाठी नियंत्रित परिस्थितीमध्ये (Controlled Conditions) वितरणात्मक न्यायाचा विचार व्हावा असे रॉल्सने सुचविले आहे. नोझीकच्या विचारांमध्ये समतेचे समर्थन केलेले नाही हे सहज लक्षात येते. पण रॉल्सने मात्र समतेची आवश्यकता मानली आहे. रॉल्सने व्यक्तिला त्याच्या सामाजिक व आर्थिक संदर्भांपासून पूर्णतः वेगळे काढले आहे. याला त्याने 'अज्ञानाचा पडदा' (veil of ignorance) असे संबोधले आहे. या पडद्यामागील व्यक्तिंना ते कोण आहेत, त्यांचे हितसंबंध कोणते आहेत, गरजा काय आहेत इ. बद्दल काहीच ज्ञान नाही. असे करण्याची काय गरज आहे? रॉल्सच्या मते, लोक आपल्या स्वार्थासाठी न्याय निर्माण होऊ देत नाहीत. त्याने अशा एका समुदायाची कल्पना केली की ज्यातील व्यक्तिंना परस्परांच्या जाती, धर्म वा प्रदेश इ. माहीत नाही. त्यांना समाजातील भेदभावांची मुळीच जाणीव नाही. रॉल्सने या काल्पनिक स्थितीला 'मूळ स्थिती' मानले आहे. या समुदायातील व्यक्तिंना अर्थशास्त्र व मानसशास्त्राचे व न्यायाचे प्राथमिक ज्ञान असेल. हे लोक स्वतःचे हित जपतात पण स्वार्थी मात्र नाहीत. चांगले जीवन म्हणजे काय याची त्यांना कल्पना नाही. पण आपल्या स्वातंत्र्य व संधीचा उपयोग करुन संपत्ती व उत्पन्न वाढविण्याची इच्छा आहे. यामध्ये असूया वा द्वेषाला स्थान नाही. रॉल्सच्या मते, हे लोक त्यांच्यावरील पडदा हटविल्यानंतर जीवनात एखादे ध्येय प्राप्त करण्याचा प्रयत्न करतील. पण जेथे अनिश्चितता असेल, तेथे मात्र ते कोणताही धोका पत्करणार नाहीत.

रॉल्सच्या मते, अशा समुदायातील लोक न्यायाच्या पुढील तत्त्वांचा पुरस्कार करतील.:

(१) प्रत्येक व्यक्तिला समान हक्क असतील. तसेच इतरांच्या बरोबरीने पूर्ण स्वातंत्र्य असेल.

(२) सामाजिक व आर्थिक विषमतांची अशा रीतीने पुन्हा मांडणी करण्यात यावी की–

(अ) सर्वाधिक दुर्बल घटकाला जास्तीत जास्त लाभ मिळावा, आणि (ब) सर्व पदे सर्वांसाठी खुली असावीत. तसेच त्यांना प्राप्त करण्यासाठी सर्वांना 'समान संधी' प्राप्त असावी.

रॉल्सच्या मते, एका व्यक्तिच्या स्वातंत्र्याचा बळी घेऊन दुसऱ्याला स्वातंत्र्य असू नये. तसेच केवळ सर्वाधिक दुर्बल घटकाच्या लाभासाठीच समतेच्या तत्वाचे उल्लंघन होऊ शकेल.

समतेचा प्रखर पुरस्कार आणि दुर्बल घटकांच्या लाभासाठी विषमतेचे समर्थन ही रॉल्सच्या विचाराचे सार आहे. भारताच्या संदर्भात सांगायचे झाल्यास ही तत्वे सर्वांना परिचीत आहेत. भारतातील खोलवर रुजलेल्या सामाजिक विषमतांना नष्ट करण्यासाठी समता स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचा पुरस्कार करणे गरजेचे होते. त्यासाठी दूरदर्शी आणि सर्जनशील राजकीय विचार निर्माण होणे आवश्यक होते.

Scanned with CamScanner

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रुपाने काळाने भारतीयांची ही गरज पूर्ण केली. डॉ. आंबेडकरांनी विषमता आणि लोकशाही यांचा सखोल चिंतन केले. तसेच त्याकडे पाहण्याची एक नवी दृष्टि प्रदान दिली. भारतासारख्या पारंपारिक व कठोर जातीव्यवस्था असलेल्या देशात समतेच्या तत्त्वाचा पुरस्कार करणे म्हणजे एक आव्हानच आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संविधाननिर्मितीप्रसंगी समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकरांनी संविधानाला न्याय आणि समतेकडे जाणारी दिशा दिली. तसेच न्याय प्रस्थापित करण्यासाठी समतेपासून दूर जावे लागेल हे देखील त्यांनी सूचित केले. समाजात असलेल्या भेदभावांना नष्ट करण्यासाठी हे आवश्यक होते. तसेच शेकडो वर्षांपासून शोषित आणि वंचित असलेल्या दलित वर्गांना न्याय मिळणे आवश्यक होते. डॉ. आंबेडकरांच्या मते, लोकशाही आणि सामाजिक विषमता एकत्र राहू शकत नाही. म्हणून भारतीय संविधानात जाणीवपूर्वक अशी व्यवस्था करण्यात आली की जेणेकरून इतिहासात वंचित राहिलेल्या समुदायांना लाभ मिळेल.

संविधानानुसार शासनव्यवस्थेत जातीभेदांचे पालन करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच विधिमंडळे, प्रशासन, आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणाची निती स्विकारण्यात आली आहे. या व्यवस्थेमुळे- अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती तसेच अन्य मागासलेल्या वर्गांना लाभ प्राप्त होत आहे. त्याची तीन प्रमुख तत्वे आहेत.:

(१) पद आणि साधन उपलब्ध करुन देण्यासाठी आरक्षण नीती, (२) या वर्गांसाठी शिष्यवृत्ती, अनुदान, कर्ज, आरोग्य सेवा, इ. सेवा उपलब्ध करुन देणे, आणि (३) मागासवर्गीयांचे शोषण करणाऱ्या भेदभावपूर्ण सामाजिक व आर्थिक परंपरांचे निर्मूलन करणे.

डॉ. आंबेडकरांचे आग्रहपूर्वक प्रतिपादन होते की, दलित आणि अन्य मागासवर्गीयांना भूतकाळात हक्क नाकारले गेले आहेत. त्यामुळे स्वतंत्र भारतात त्यांच्या मागण्या पूर्ण करणे हे सर्वांचे प्रथम कर्तव्य आहे.

## ■ रॉल्सच्या सिद्धांताच्या मर्यादा ■

## (Limitations of Rawl's Theory of Justice )

सी.बी.मॅकफर्सन (C.B.Macperson) या विचारकाने असे प्रतिपादन केले आहे की, रॉल्सचा न्यायाविषयी सिद्धांत हा प्रत्यक्षात उदारमतवादी – लोकशाही भांडवलवादी कल्याणकारी राज्याचे समर्थन करणारा आहे.

रॉल्सने हे मान्य केले आहे की, जरी संधी व शिक्षणाची समता आणली तरीही कुटुंबव्यवस्थेमुळे विषमता कायम असेल. उदा. एका उद्योगपतीचा मुलगा आणि कामगाराचा मुलगा ह्यांच्यात भेद असणे स्वाभाविक आहे. पण रॉल्सच्या मते अशा विषमतांमुळे व्यक्तिच्या अपेक्षा उंचावतात आणि त्या पूर्ण करण्यासाठी ती अधिक संपत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न करते. त्याचा लाभ समाजात सर्वांनाच होतो. परंतु मॅकफर्सनच्या मते, विषमतेचे अशा प्रकारचे समर्थन चुकीचे आहे. रॉल्सने उत्पन्न व संपत्तीच्या आधारावर असलेली विषमता अपरिहार्य असल्याचे मान्य केले आहे. पण मॅकफर्सनच्या मते, अशा विषमतेमुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर विपरित परिणाम होऊन समाजात सत्तेची विषमता निर्माण होईल.

मॅकफर्सनच्या मते, रॉल्सने न्यायाचा सार्वत्रिक (Universal) विचार केला नसून केवळ उदारमतवादी दृष्टीकोनातून त्याकडे पाहिले आहे. रॉल्सच्या मते, त्याचा सिद्धांत हा अशा व्यक्तिसमूहाला लागू आहे की जे स्वतंत्र व समान असून समाजाचे ध्येय काय असावे याविषयी त्यांचे कोणतेही निश्चित एकमत वा करार नाही. अशा समाजात त्याचा न्याय सिद्धांत स्थिरता आणि एकता निर्माण करेल. पण मॅकफर्सनच्या मते, रॉल्सने केवळ कल्याणकारी स्वरुपाच्या उदारमतवादी- लोकशाही समाजाचाच विचार केला आहे. त्यामुळे त्याचा सिद्धांत सार्वत्रिक असू शकत नाही.

Scanned with CamScanner

## समुदायवादी टीका (Communitarian Critique)

रॉल्सने वर्णन केलेल्या सिद्धांतानुसार 'मूळ स्थिती' (Original Position) मध्ये असलेल्या लोकांनी निवडलेल्या निती व तत्वांच्या आधारे न्यायाचा पाया रचला गेला आहे. पण समुदायवाद्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ति ही पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या सामाजिक संघटनेची सदस्य असते. त्यामुळे व्यक्तिच्या मनात येणाऱ्या संकल्पना या त्याच्या समाज वा समुदायातच निर्माण झालेल्या असतात. त्यामुळे वितरणासंबंधी त्याच संदर्भात विचार होणे स्वाभाविक आहे. उदा. अनेक समाजात शेतीच्या उत्पादित धान्याचा एक हिस्सा देवतेला वा पुरोहिताला अर्पण करण्याची परंपरा होती. आजच्या काळात कदाचित हे अस्विकारणीय वाटेल. पण पुरातन काळात त्या परंपरेला विशिष्ट संदर्भ व अर्थ होता.

सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ नसलेली व्यक्ती पर्याय निवडू शकते यावर समुदायवाद्यांचा विश्वास नाही. रॉल्सने 'अज्ञानाचा पडदा' (Veil of ignorance) निर्माण करून व्यक्तिला त्याच्या सामाजिक संदर्भापासून दूर ठेवले आहे. अशा स्थितीत व्यक्ती योग्य पर्याय कशी निवडू शकेल? समुदायवाद्यांच्या मते व्यक्ति चांगल्या-वाइटाची परख समुदायाच्या संदर्भातच करते. योग्य काय आहे हे केवळ व्यक्ति ठरवित नाही तर समुदायाने सामूहिकपणे जे मानले असेल, ते योग्य ठरते.

मिचेल वॉल्झरने (Michael Walzer) त्याच्या 'Spheres of Justice' या ग्रंथात समुदायवादी दृष्टिकोनातून रॉल्सच्या सिद्धांतावर टीका केली आहे. वॉल्झरच्या मते, कोणत्याही न्यायव्यवस्थेचे योग्य की अयोग्य हे मूल्यांकन केवळ सामाजिक संदर्भात होऊ शकते. समाजात ज्या धारणा प्रचलित असतात त्यानुसार साधनांचे वितरण होत असते. उदा. जातीव्यवस्था असलेल्या समाजात व्यक्ती कोणत्या जातीमध्ये जन्माला येते यावर तिला मिळणाऱ्या सामाजिक सुविधा व हक्क अवलंबून असतात. जोपर्यंत समाजात असलेल्या व्यवस्थेला योग्य मानतात, तोपर्यंत त्याच आधारावर व्यवहार होत राहतात. तात्पर्य, व्यवस्था समजून घेण्यासाठी एका व्यक्तिचे विचार वा कृती पाहणे पुरेसे नसून त्याचा सामाजिक संदर्भ लक्षात घेतला पाहिजे. याच अर्थाने न्यायदेखील समुदायवादी दृष्टीकोनातून घेतला पाहिजे.

## स्त्री मुक्तिवादी टीका (Feminist Critique)

सुसान मॉलर ऑकिन (Susan Moller Okin) ह्या लेखिकेने तिच्या 'Justice, Gender and the Family' नामक ग्रंथात असे मत मांडले की न्यायासंबंधी चिंतन वा लेखनामध्ये कुटुंबव्यवस्थेचा गांभीर्याने विचार केला जात नाही. रॉल्सचे लेखनसुद्धा त्याला अपवाद नाही. मूलत: कुटुंब हे 'खाजगी' (Private) मानले जाते तर न्याय ही संकल्पना 'सार्वजनिक' (Public) स्वरुपाची मानली जाते. प्रत्यक्षात न्याय संकल्पना व त्यावर आधारित कायद्यांचा मोठा प्रभाव कुटुंबव्यवस्थेवर पडतो. पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मालमत्ता, वारसा हक्क, घटस्फोट, दत्तकविधान, इ. असे कितीतरी कायदे कुटुंबाशी संबधित आहेत. तसेच कुटुंबव्यवस्थेतील परंपरा व पद्धतींची सार्वजनिक जीवनावर छाप उमटलेली दिसते. उदा. कुटुंबात अधिक कष्ट करणाऱ्या स्त्रीकडून कुटुंबाच्या बाहेरसुद्धा तशाच प्रकारची अपेक्षा केली जाते. या विषम श्रमविभाजनाला सामाजिक परंपरा कारणीभूत ठरतात. चूल आणि मूल एवढ्यापुरते कार्यक्षेत्र असलेल्या स्त्रीला समाजात मुक्त जीवन जगण्याची संधी मिळत नाही.

रॉल्सच्या संकल्पनेत बहुधा पुरुषच कुटुंबप्रमुख म्हणून एकत्र येतात आणि न्यायाची तत्त्वे निश्चित करतात. रॉल्सने कुटुंबाला समाजरचनेचा आधार मानले आहे. पण कुटुंबांतील विषमतांचा मात्र त्याने विचार केला नाही.

काही स्त्रीमुक्तिवाद्यांच्या मते, रॉल्सने ज्या स्वायत्त, स्व-हित जपणाऱ्या आणि बुद्धीवादी व्यक्तिची

Scanned with CamScanner

कल्पना केली आहे, ती पुरुषप्रधान आहे. त्यामुळे संगोपन, देखभाल, सहकार्य यांसारख्या स्त्रीसुलभ भावनांचा त्यामध्ये विचार करण्यात आलेला नाही. तात्पर्य, रॉल्सने आपल्या सिद्धांतात स्त्रीच्या भूमिकेचा विचार केला नाही.

## अमर्त्य सेनचे विचार

## (Amartya Sen's Extension of John Rawl's Theory of Justice)

अमर्त्य सेनच्या मते, जॉन रॉल्सने आपल्या न्याय सिद्धांतामध्ये केवळ स्वातंत्र्यप्राप्तीच्या साधनांचा विचार केला. परंतु त्या स्वातंत्र्याचा विस्तार किती आहे याचे चिंतन केले नाही. सेनने कार्यक्षमतेच्या (capability) दृष्टीने न्यायाकडे पाहिले आहे. व्यक्तिजवळ साधने असणे पुरेसे नसून व्यक्ती त्यांचा उपयोग चांगले जीवन जगण्यासाठी किती व कसा करते हे महत्त्वाचे आहे.

समजा, दोन व्यक्तिंना समान साधने दिलेली आहेत. त्यामुळे दोघांनाही समान स्वातंत्र्य मिळण्याची हमी देता येईल काय? या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर आहे. कारण शारीरिक मर्यादा व अन्य आव्हाने त्यांच्या कार्यक्षमतेवर बंधन आणतात. सेनने हे स्पष्ट केले की, व्यक्तिचे जीवनातील पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य म्हणजे कार्यक्षमता होय. जीवनाचा मार्ग कोणता असावा याविषयी सर्वांमध्ये एकमत असण्याचे काही कारण नाही.

कार्यक्षमता म्हणजे स्वातंत्र्य आहे असे सेनचे मत आहे. परंतु रॉल्सने साधनांच्या उपलब्धतेला स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग मानले आहे. साधनांचे समान वितरण केले तरीही त्यामुळे ध्येयप्राप्तीसाठी समान स्वातंत्र्याची हमी प्राप्त होत नाही. व्यक्ति-व्यक्तिमध्ये आपले ध्येय प्राप्त करण्याच्या कार्यक्षमतांमध्ये जो तफावत आहे, त्यांचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन सेन यांनी केले आहे. रॉल्सने केवळ व्यक्तिच्या साधन निवडण्याच्या स्वातंत्र्याचा विचार केला. पण सेनच्या मते, लोक आपल्या साधनांचे स्वातंत्र्यामध्ये रुपांतर कसे करतात हे महत्वाचे आहे. वय, लिंग, आनुवांशिकता इ. कारणांमुळे व्यक्ति-व्यक्तिमध्ये भेद निर्माण होतात हे लक्षात घेतले पाहीजे.

## राज्याचा विलयवादी सिद्धांत (End-State Theories)

कार्ल मार्क्सने 'Critique of the Gotha Programm' या ग्रंथात न्याय संकल्पनेची विस्तृत चर्चा केली आहे. त्याने संक्रमणावस्थेतील समाज आणि साम्यवादी समाज अशा दोन वेगवेगळ्या अवस्थांचा विचार केला आहे.

संक्रमणावस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तिला उत्पादनामध्ये त्याने केलेल्या श्रमानुसार वाटा मिळेल. पण या न्याय व्यवस्थेमध्ये श्रमिकांच्या बुद्धीमत्ता आणि गरजांकडे दुर्लक्ष होते याची मार्क्सला जाणीव होती. म्हणूनच साम्यवादी समाजामध्ये प्रत्येक व्यक्तिला त्याची पात्रता व गरजेनुसार वाटा मिळेल असे मार्क्सने स्पष्ट केले.

मार्क्सच्या मते, जर केवळ न्याय आणि अधिकार प्रदान केल्याने समाज एकसंध राहात असेल तर ते चुकीचे आहे. रॉल्सच्या दृष्टीकोनातून न्याय हा सामाजिक संस्थांचा पाया आहे, तर मार्क्सने खऱ्या अर्थाने चांगल्या समाजाला न्यायाच्या संकल्पनेची गरजच नाही असे मानले. परंतु संघर्ष आणि अभावाच्या परिस्थितीत समाज सुरळीतपणे चालविण्यासाठी न्याय तत्वाची आवश्यकता भासेल. पण जर लोकांचा व्यवहार परस्पर आदर व सहकार्याचा असला तर न्यायतत्वाची गरजच राहणार नाही. मार्क्सने असेही सांगितले की, सहकार्याच्या भावना असलेला समाज निर्माण करण्यासाठी खाजगी मालमत्ता नष्ट करणे आवश्यक आहे. कारण खाजगी मालमत्ता शोषणाला प्रोत्साहन देते.

Scanned with CamScanner

मार्क्सच्या मते श्रमामुळे उत्पादित वस्तुला मूल्य प्राप्त होते. भांडवलशाहीत श्रमिक अगणित संपत्ती निर्माण करतो. पण त्याला त्या संपत्तीमधील अत्यल्प वाटा मिळतो, यावर उत्पादनाचे सामाजिकीकरण हा उपाय मार्क्सने सुचविला. यामुळे श्रमिकांना उत्पादन प्रक्रियेमध्ये आपले मत प्रभावीपणे मांडता येईल. तसेच त्यांच्या मूळ गरजा पूर्ण होऊन ते संतुष्ट होतील. मार्क्सच्या दृष्टिने केवळ नफा कमावण्यासाठी असलेली उत्पादन पद्धती न्याय निर्माण करु शकत नाही. खऱ्या अर्थाने श्रमिकांच्या मूल गरजा पूर्ण होत असतील तरच न्याय स्थापन झाला असे म्हणता येईल.

मार्क्सप्रमाणेच राज्यसंस्थेच्या विलयाचे (end of state) समर्थन करणाऱ्या सिद्धांतांमध्ये जीवनाचा एक निश्चित मार्ग मनुष्याला सुखप्राप्तीकडे नेतो हे सांगितले आहे. फक्त तो मार्ग स्वीकारुन अन्य मार्ग प्रतिबंधित करावे असे हे सिद्धांत सुचवितात. त्यामुळेच राज्याच्या विलयाचे वा विनाशाचे समर्थन करणारे सिद्धांत हुकूमशाहीला प्रोत्साहन देणारे आहेत असे टीकाकारांचे मत आहे. त्यांच्या मते, राज्य हे समाजात न्याय निर्माण करण्याचे गोंडस कारण पुढे करुन हस्तक्षेप करुन व्यक्तिच्या स्वातंत्र्यावर बंदी आणण्यास मागेपुढे पाहणार नाही.

परंतु रॉल्सची भूमिका या सिद्धांतांच्या विरोधी स्वरुपाची आहे हे लक्षात घेतले पाहिजे. रॉल्सने उत्तम जीवनाची कोणतीही एक संकल्पना स्वीकारलेली नाही.

## स्त्रीमुक्तीवाद्यांची न्याय संकल्पना
## (Feminist Accounts of Justice)

स्त्रीमुक्तीवादी विचारकांनी केवळ स्त्रीवर्गाच्या दृष्टीकोनातून सार्वत्रिक न्यायसंकल्पनेपेक्षा वेगळी अशी न्याय संकल्पना निर्माण करता येईल का? या विषयावर चिंतन केले आहे.

या विचारकांच्या मते, काळजी घेणे, देखभाल करणे, प्रेम, मूल्ये इ. सर्व स्त्रीच्या नैतिकतेची लक्षणे आहेत. तर सार्वत्रिक नैतिकतेची चौकट ही प्रामुख्याने पुरुषप्रधान आहे. नेल नॉडिंग्ज या विचारकाने या दोन नैतिक चौकटींमधील फरक उदाहरणाने स्पष्ट केला आहे. त्याने अब्राहम व सेरीस यांचे उदाहरण देऊन स्पष्ट केले की, अब्राहम नीती व तत्त्वांसाठी आपल्या मुलांचा बळी देण्यास तयार होता. तर सेरीस आपल्या मुलाकरिता कोणत्याही तत्त्वाचा त्याग करण्यास तयार होती. हा न्याय आणि मातृत्त्वातील मूल भेद आहे.

अनेक स्त्रीमुक्तिवादी विचारकांनी असा भेद मानण्यास नकार दिला आहे. कारण पुरुष, वात्सल्य आणि प्रेम करीत नाही हे कोणीही मान्य करणार नाही. तसेच तर्कनिष्ठ, सार्वत्रिक आणि वस्तुनिष्ठ विचारांपासून स्त्री दूर आहे असेही कोणी म्हणणार नाही. बहुतेक स्त्रीमुक्तिवाद्यांचे असे प्रतिपादन आहे की, या दोन नैतिकतेच्या भिन्न चौकटींमध्ये सुसंगती निर्माण व्हावी. सुसान ऑकीन ह्या विचारिकेने स्त्रीमुक्तिवादी दृष्टीकोनातून न्याय संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला. अनेक स्त्रीमुक्तिवादी असे मानतात की, स्त्रीसुलभ वात्सल्य व प्रेमाच्या भावनेला न्यायाचा आधार मिळणे आवश्यक आहे. वात्सल्य व न्याय हे परस्परपूरक असावेत.

## सारांश (Conclusion)

आपण या प्रकरणात न्यायाची उदारमतवादी भूमिका तसेच रॉल्सने त्या भूमिकेमध्ये सुचविलेल्या सुधारणांचे विश्लेषण केले. तसेच रॉल्सच्या विचारांवर मॅकफर्सनने केलेली टीका समजावून घेतली. रॉल्सच्या न्याय सिद्धांतावर समुदायवादी तसेच स्त्रीमुक्तिवादी आक्षेपांचा परामर्श घेतला. अमर्त्य सेनने रॉल्सच्या सिद्धांतात कशा प्रकारे भर घातली याचासुद्धा विचार केला. आपण मार्क्सच्या तसेच शेवटी

Scanned with CamScanner

स्त्रीमुक्तिवादी न्यायसिद्धांताचे अवलोकन केले.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की न्यायाची कोणतीही एक सर्वमान्य व्याख्या असू शकत नाही. आपल्या सभोवतालचे जग कसे आहे आणि ते बदलविण्यासाठी आपण काय करू शकतो [illegible] न्याय संकल्पना समजून घेणे उचित आहे. न्याय ही राजकीय संकल्पना आहे आणि राजकीय दृष्टिकोनातून तिला समजून घेतले पाहिजे.

## चर्चेकरिता मुद्दे :

१. उदारमतवादानुसार कोणताही समुदाय आपल्या प्रथा वा परंपरा व्यक्तिवर थोपवू शकत नाही. हे [illegible] कितपत संभव आहे? राजस्थानच्या काही भागात आजही बालविवाहाची परंपरा दिसून येते. [illegible] मुलांचे पालक या परंपरेचे समर्थनही करताना दिसून येतात. आपण या परिस्थितीत पालक [illegible] कोणती भूमिका स्विकाराल?

२. विनोबा भावेंच्या भूदान चळवळीवर रॉबर्ट नोझिकची काय प्रतिक्रिया असेल?